# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्थायी समिती सभा दि. १६/०६/२०१०

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा बुधवार दिनांक १६/०६/२०१० रोजी सभा सुचना क्र. ०३ दि. ०४/०६/२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. दिनेश नलावडे हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. दिनेश दगडू नलावडे | -- | सभापती |
| २) | श्रीम. ग्रिटा स्टिफन फॅरो | -- | सदस्या |
| ३) | श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद | -- | सदस्या |
| ४) | श्री. याकुब ईस्माईल कुरेशी | -- | सदस्य |
| ५) | श्री. अनिल दिवाकर सावंत | -- | सदस्य |
| ६) | श्री. जुबेर इनामदार | -- | सदस्य |
| ७) | श्री. मदन उदितनारायण सिंह | -- | सदस्य |
| ८) | श्री. शरद केशव पाटील | -- | सदस्य |
| ९) | श्री. प्रविण मोरेश्वर पाटील | -- | सदस्य |
| १०) | श्री. चंद्रकांत भिकालाल मोदी | -- | सदस्य |
| ११) | श्री. चंद्रकांत म्हात्रे | -- | सदस्य |
| १२) | सौ. सुधा व्यास | -- | सदस्या |
| १३) | सौ. वर्षा भानुशाली | -- | सदस्या |
| १४) | सौ. निर्मला सावळे | -- | सदस्या |
| १५) | सौ. अनिता पाटील | -- | सदस्या |

**गैरहजर सदस्य –**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. बर्नट अल्बर्ट डिमेलो | -- | सदस्य |

**मा. सभापती :-**

मा. आयुक्त सो., मनपाचे सर्व अधिकारी वर्ग व सर्वांचे मी स्वागत करून सचिव साहेबांनी आपल्या मिटींगला सुरूवात करावी.

**नगरसचिव :**

स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक ०४/०६/२०१० अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दि. ११/०६/२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. परंतु सदरची सभा काही अपरिहार्य कारणास्तव पुढे ढकलण्यातून येत असून सदरची सभा बुधवार दिनांक १६/०६/२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०३, दि. ०४/०६/२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे प्रकरण क्र. २०, दि. ०९/१२/२००९ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**याकुब कुरेशी :-**

दि. ०९/१२/२००९ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**ग्रिटा फॅरो :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. २० :-**

दि. ०९/१२/२००९ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १८ :-**

दि. ०९/१२/२००९ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. याकुब कुरेशी** **अनुमोदक :- श्रीम. ग्रिटा फॅरो**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २१, केंद्र शासनाच्या (JNNURM) योजनेअंतर्गत खरेदी केलेल्या बस प्रकल्पाकरीता महानगरपालिका फंडातून तात्पुरत्या कालावधीकरीता बस प्रकल्प खात्यात निधी वर्ग करण्याबाबत.

**मदन उदितनारायण सिंह :-**

सभापती साहब ये जो विषय लाये है ये महासभा मे उसका ठराव हुआ था कि, कंत्राटदारसे पैसा सब भरने का जो ठराव महासभा मे हुआ उसको विखंडीत करनेका या उसमे चेंजेस करनेका स्थायी समिती को राईट है क्या।

**शरद पाटील :-**

हे जे पैसे आपण त्यांना देणार हे कुठच्या हेडमधून देणार आपण?

**मा. आयुक्त :-**

मा. सभापती साहेब, केंद्रशासनाने ५० बस मंजूर केलेल्या आहेत. त्याची एकुण किंमत होती ११ कोटी रू. महाराष्ट्र शासनाला केंद्रशासनाकडून ४ कोटी ९४ लाख ३९ हजार चारशे रूपये मिळणार आहे. (४,९४,३९,४०० रूपये) तर ५० टक्के ची रक्कम आहे ती फक्त आम्हाला ९४ लाख आणि नंतर ४० लाख अशी रक्कम आलेली आहे. मा. स्थायी समितीच्या मंजूरीने बस बॉडी बांधकामासाठी दिलेली आहे. हे सगळे टाटाला जेसी खरेदीसाठी द्यायचे आहेत. आठ चेसिज चे पैसे त्यांना दिल्यानंतर बॉडी बांधून झालेली आहे. बाकीचे ४२ चेसिज खरेदीचे जे पैसे आहेत ते टाटा कंपनीला भरण्यासाठी मंजूरी मागितलेली आहे. केंद्रशासनाकडे आपली इतकी रक्कम राहिलेली आहे. ती रक्कम मिळावी म्हणून मागणी केलेली आहे. इतर महापालिकेला वेळेवर आलेले आहे. परंतु आम्हाला वेळेवर मिळाले नाही म्हणून केंद्रशासनाकडे महाराष्ट्र शासनाने सुध्दा पत्र पाठविलेले आहे. थोड्या कालावधीसाठी त्यांच्याकडून पैसे मिळेपर्यंत महापालिकेने इकडे भरावयाचे आणि त्यांचे आल्यानंतर त्या खात्यात जमा करावयाचे आहेत.

**शरद पाटील :-**

अस तुम्ही गोषवाऱ्यामध्ये क्लिअरकट लिहिले नाही ना पण.

**मा. आयुक्त :-**

लिहिलेले आहे ना.

**शरद पाटील :-**

कुठे लिहिले आहे. ९४ लाख आणि ३० लाख रूपये कुठे आहे ते सांगा आम्हाला.

**मा. आयुक्त :-**

नाही, नाही ३० लाख आम्हाला महापालिकेला मिळालेले आहेत, ४० लाख आणि ९४ लाख.

**शरद पाटील :-**

नाही आता आपल्याला किती द्यायचेत त्यांना?

**मा. आयुक्त :-**

आता आपल्याला ४ कोटी ९४ लाख, ३९ हजार ४०० रुपये (रू. ४,९४,३९,४००) त्यांच्याकडून मिळणार आहेत. परंतु आम्हाला टाटा कंपनीकडे किती भरायचेत. या चेसिजची. रक्कम भरायची आहे.

**शरद पाटील :-**

मग ते आपण ते कुठच्या हेडमधून घेणार आहोत.

**मा. आयुक्त :-**

पी. पी. पी. तत्वावर चालविण्याकरिता ठेकेदाराकडून जमा रक्कम ५ कोटी जी आहे. त्या हेड खालून आपण तिकडे भरणार कारण आपण ५० टक्के भरणार होतो. त्या ऐवजी इकडे भरणार आणि पी.पी.पी. पी. चे टेंडर संपूर्णपणे त्या कॉन्ट्रक्टरने भरावयाचे आहे.

**शरद पाटील :-**

म्हणून आपला जो महासभेमध्ये ठराव झाला होता याचा...

**मा. आयुक्त :-**

ती तात्पुरती व्यवस्था आहे. केंद्रशासनाकडून पैसे मिळेपर्यंत बस बॉडी बांधून व्हायला पाहिजे म्हणून तात्पुरती व्यवस्था केलेली आहे.

**शरद पाटील :-**

नाही, नाही. हे पी.पी.पी. तत्वावर आपण करणार होतो. आपण ठेकेदाराकडून आपण देणार होतो ना मग ठेकेदाराडून पैसे का आले नाही.

**मा. आयुक्त :-**

बस बांधण्यापूर्वी ठेकेदाराची टेंडर आत्ता आम्ही कॉल केलेत. बस बांधून तयार होईपर्यंत तो ठेकेदार टेंडर येणार, आता अगोदर आपण बस खरेदीचे टेंडर मंजूर झाल्यानंतर लगेचच आपण काढू शकत नाही.

**शरद पाटील :-**

ऐवढ घाई घाईने केल. आपल्याला ते फेब्रुवारी महिन्यात करायचे होते म्हणून घाई घाईने याचा ठराव आणला. सगळ केल आणि आज जून उगवला तरी त्याच टेंडर तुम्ही का काढल नाही?

**मा. आयुक्त :-**

टेंडर प्रसिध्द झालेल आहे.

**शरद पाटील :-**

टेंडर प्रसिध्द झाले मग त्याच टेंडर आल का नाही. कोणाच टेंडर आल आहे.

**मा. आयुक्त :-**

नाही, अजून टेंडर आलेले नाही. शेवटची तारीख केव्हा आहे? २९ तारीख शेवटची आहे.

**शरद पाटील :-**

मग, २९ तारखेपर्यंत वाट पाहून घ्याना.

**मा. आयुक्त :-**

वाट बघायचे म्हणजे टेंडर मंजूर होईपर्यंत बस रोड वर आले पाहिजेत का? तो पर्यंत चेसिज खरेदी करून बॉडी बांधकामाला द्यावी लागेल ठेकेदार काही असाच येणार नाही.

**शरद पाटील :-**

मा. महासभेचा अधिकार डावलून आपण हे करत आहोत.

**मा. आयुक्त :-**

मा. महासभेचा अधिकार कुठे डावलला.

**शरद पाटील :-**

तुम्ही आता ह्यात जेव्हा हे स्टॅंडींग पुढे आणून मंजूर घेता आमच्याकडून त्या पैशासाठी तर महासभेचा अधिकार डावलता आहात.

**मा. आयुक्त :-**

मा. महासभेचे ऑर्डर आम्ही डावलत नाही महासभेत ही फिक्स डिपॉझिट मोडायच फायनानसियल अधिकार स्थायी समितीला आहे. म्हणून तात्पुरती केंद्रशासनाकडून पैसे येईपर्यंतच्या कालावधीमध्ये ही रक्कम त्यांना भरून चेसिज बॉडी बांधकामाला द्यायची आहे.

**शरद पाटील :-**

कुठचे आपण फिक्स डिपॉझिट मोडणार आहात?

**शरद बेलवटे :-**

मा. सभापतीच्या मान्यतेने बोलतो. कंत्राटदाराचे सिक्युरिटी, ए.एम.डी आपल्याकडे जी जमा होते ते जे खात आहे ते स्वतंत्र वेगळ खात ठेवलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

नाही आता त्यांना ते सविस्तर सांगावे लागेल. आतापर्यंत जे कॉन्ट्रक्टर सिक्युरिटी डिपॉझिट भरत होते. समजा बील आपण पेमेंट केले त्याची ५ टक्के रक्कम कापून घेत होतो. सहा महिन्यासाठी ती रक्कम तीन वर्षाच्या आत त्यांना काढून घ्यायची होती. त्यांनी ती काढून घेतलेली नाही. ती रक्कम जमा आहे. ती रक्कम वापरली. वापरण्यासाठी तुमच्या पुढे आणली आहे.

**शरद पाटील :-**

मग, अशी किती रक्कम जमा आहे त्यांची?

**मा. आयुक्त :-**

साडे सहा कोटी आहे. त्यामधून ४ कोटी ९४ लाख काढावयाचे आहेत.

**शरद पाटील :-**

आम्हाला हे योग्य वाटल नाही साहेब!

**जुबेर इनामदार :-**

त्याचा इंन्ट्रेस लॉस कोण भरेल.

**मा. आयुक्त :-**

इंन्ट्रेस लॉस केंद्र शासनाने तुम्हाला ५० बस मंजूर केलेले आहेत आणि पूर्ण ५० टक्के रक्कम केंद्र शासन देणार आहे. केंद्रशासनाकडून पैसे न आल्यामुळे हे केल आहे. मग केंद्रशासनाकडून तुमच्या म्हणण्याप्रमाणे व्याजपण मागू.

**जुबेर इनामदार :-**

मागणी तर करायला पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

करू, मागणी करा पत्रामध्ये की, तुम्ही लेट पैसे दिल्यामुळे आमचे व्याज बुडाले त्या व्याजाची रक्कम द्यावी म्हणून.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब मुळात हा प्रोजेक्ट लेट का झाला. मा. महासभेने, मा. स्थायी समितीने तुम्हाला वेऴेवर मान्यता दिलेली होती. टेंडर सुध्दा वेळेवर निघाले होते, मग हा प्रोजेक्ट एप्रिलमध्ये बस धावणार होत्या आपल्या. तुम्ही कमीटमेंट दिली होती स्थायी समितीमध्ये मग हा प्रोजेक्ट लेट का झाला?

**जुबेर इनामदार :-**

घाईगर्दीने मान्यता ही घेतली होती.

**मा. आयुक्त :-**

लेट यासाठी झाली की, केंद्रशासनाकडून वेळेवर पैसे आले नाहीत आणि चेसिज जे टाटाकडून खरेदी करावयाचे आहेत. शासकिय दराने. त्या चेसिजची डिमांड ड्राफ्ट पोहचल्याशिवाय चेसिज जेवढे डिमांड ड्राफ्ट दिला आम्ही ९४ लाख आणि ४० लाख अशी रक्कम त्यांच्याकडून आल्यानंतर बॉडी बांधकाम करणाऱ्यांना थोडी-थोडी रक्कम दिली आणि थोडी रक्कम आपण चेसिज खरेदीला दिली. चेसिज खरेदी केल्याशिवाय बॉडी बांधकाम होत नाही. आम्हाला वाटले की पैसे रिलिज होतील. परंतु टप्प्या टप्प्या ने देणार म्हटले आणि केंद्रशासनाचा बजेट चालू होता. बजेटमध्ये रिॲप्प्रुपेशन करून ते देणार होते म्हणून उशीर झाला. समजा चेसिज आपण वेळेवर दिले असले तर आता आठ बसचे बॉडी बांधून तयार आहे. फक्त त्यांनी चेसिज न दिल्यामुळे बॉडी बांधकाम राहिलेले आहे. आणि टाटा कंपनीने रक्कम दिल्याशिवाय चेसिज आम्ही पोहोचवणार नाही असे सांगितले आहे.

**जुबेर इनामदार :-**

चेसिज शिवाय बॉडी बांधकाम कशी केली.

**मा. आयुक्त :-**

आठ चेसिज आम्ही पोहोचवले. त्यामुळे आठ बॉडी बांधून झालेले आहेत, ४२ चेसिज द्यायचे आहेत. त्यासाठी तुमच्यापुढे हा विषय आणला. केंद्रशासनाकडून पैसे न आल्यामुळे आपण ही व्यवस्था केली.

**जुबेर इनामदार :-**

तिथून हलगर्जीपणा झाला केंद्रशासनाकडून म्हणजे आपले प्रशासन कुठे कमी पडले नाही ना.

**मा. आयुक्त :-**

केंद्रशासनाकडून रक्कम न आल्यामुळे चेसिज खरेदी होऊ शकली नाही.

**अनिल सावंत :-**

का आले नाही. आता आयुक्त साहेब आपण सांगितले इतर महानगरपालिकेला वेळेवर पोहचले मग मिरा भाईंदर महानगरपालिकेला का पोहोचले नाही.

**मा. आयुक्तः-**

त्यांनीसुध्दा स्वतःचे पैसे वापरलेली आहेत. त्यांच्याकडे पैसे होते. त्यांनी अगोदरच वापरले आणि चेसिज बांधून घेतली आणि मग पैसे मागितले आपण चेसिज साठीच पैसे मागितले आणि ते वेळेवर आले नाही.

**अनिल सावंतः-**

ज्या सद्या ५० बस धावतात त्यांच सिक्यूरीटी डिपॉझिट तुम्ही वापरणार बरोबर ना.

**मा. आयुक्तः-**

त्यांचे नाही

**अनिल सावंतः-**

मग कोणाचे

**मा. आयुक्तः-**

वेगवेगळया पाणीपुरवठा, बांधकाम, आरोग्य यामध्ये जे कॉन्ट्रक्टवर टेंडर मंजूर करतो आपण आणि त्यांच्याकडून बयाणा रक्कम सुरवातीला घेतो आणि नंतर सिक्यूरीटी डिपॉझिट घेतो तो बयाणा रक्कम कन्वर्ट होतो सिक्युरीटी डिपॉझिट मध्ये आणि बिलातून जी कपात होतो ती सुध्दा सिक्युरीटी डिपॉझिट मध्ये जमा होते. अशी टोटल ५ टक्के रक्कम जमा ६ महिन्यानंतर ती अदा करावयाची आहे. ६ महिन्यानंतर जी अदा करावयाची आहे ती साडेसहा कोटी आहे. त्यामधून ४ कोटी ९४ लाख काढावयाची आहेत.

**अनिल सावंत :-**

मग परीवहनच्या ठेकेदाराचे सिक्युरीटी डिपॉझिट किती जमा आहे आता.

**मा. आयुक्त :-**

बँक गॅरंटी असेल त्यांची

**अनिल सावंत :-**

नाही, बँक गॅरंटी नाही, सिक्युरीटी डिपॉझिट

**शरद पाटील :-**

आपण समजा एखाद्याची सिक्युरीटी आली ती कोणाची आहे.

**अनिल सावंत :-**

ते इतर टेंडरचा तो विषय समजला, शरद इतर ठेकेदार बांधकाम वगैरे सर्व.

**मा. आयुक्त :-**

महापालिकेमध्ये एकूण जेवढे ठेकेदार आहेत त्यांच सिक्युरीटी डिपॉझिट आपण कपात करुन ठेवतो ते त्यांचे पैसे आपल्याकडे जमा असतात त्यांनी मागणी केली नाही. आणि आपल्याकडे जमा आहेत त्यातून आपण हे खर्च करणार आहोत.

**अनिल सावंत :-**

परिवहनच्या ठेकेदारांची किती सिक्युरीटी डिपॉझीट जमा आहे १०० टक्के बँक गॅरंटी नाही.

**मा. आयुक्तः-**

४२ लाख बँक गॅरंटी आहे.

**अनिल सावंतः-**

१०० टक्के बँक गॅरंटी नाही आहे साहेब, ॲग्रीमेंट बघा, त्यामध्ये २.५ इनकॅश आहे आणि २.५ बँक गॅरंटीं आहे. मागच्या वेळी पण असचं झालं होतं. ठेका दिला होता पाच वर्ष झालं होत. ठेका दिला होता. जवळ जवळ ५ वर्ष झाली पण अजून काही सिक्युरीटी डिपॉझिट जमा केली नाही त्या ठेकेदारानी

**शरद पाटील :-**

किती घेऊ म्हणे आम्हाला समजत नाही तुम्ही मिटींगला येता त्यावेळी माहिती घ्यायची वेळ आहे का? प्रत्येक वेळेला काय ऑडीटरला माहिती.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त साहेब ही चर्चा परिवहनचा ज्या दिवशी इथे अर्थसंकल्पाची चर्चा होती ना त्यादिवशी हा विषय काढायचा साहेब

**अनिल सावंत :-**

परिवहनचे सुधारित बजेट मागवा. त्याची ॲग्रीमेंट मागवा.

**मदन उदितनारायण सिंह :-**

जो अपना गोषवारा है। उसमे सेकंड पॅरामे दिया है प्रकल्पाकरीता केंद्र व राज्य शासनाकडून मिळविण्याचे एकूण अनुदानाच्या रक्कमेपैकी १ कोटी ३७ लाख रक्कम जमा झाली आहे. ती कुठून आली आहे.

**मा. आयुक्तः-**

नाही. त्यांच काय म्हणणं आहे की, बँक गॅरंटी किंवा सिक्युरीटी डिपॉझिट किती आहे हे उत्तर द्यायचं आहे. बजेच्या अनामत रकमेचा काय आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

नाही. जो कॉन्ट्रॅक्ट ने जमा किया है।

**मा. आयुक्तः-**

३२ लाख सांगितलेला तुम्हाला

**मदन उदितनारायण सिंह :-**

नाही,नाही कंत्राटदारका कंट्राटाबाबत आगाऊ रक्कम अदा केली आहे तो कोण कंत्राटदार आहे

**मा. आयुक्तः-**

कुठला पॅरा.

**मदन उदितनारायण सिंह :-**

सेकंड पॅरा, प्रकल्पाकरिता रकमेपैकी १ कोटी ३७ लाख रक्कम खात्यात जमा झाली असून पूर्व परवानगी ने सदर रक्कम कंत्राटदारांने कंत्राटाबाबत आगाऊ ॲडव्हान्स अदा केली आहे. हा कोण कंत्राटदार आहे.

**मा. आयुक्तः-**

एकूण गर्व्हमेंट कडून मिळालेले आहे १ कोटी ३७ लाख त्यापैकी चेसिज ८ खरेदीसाठी चेसिज वाल्यांना दिले आणि बॉडी बांधकामाला थोडी थोडी रक्कम दिली.

**मदन उदितनारायण सिंह :-**

कंत्राटधारकाने कंत्राटाबाबत आगाऊ रक्कम जमा केलेली आहे कंत्राटधारक कोण?

**मा. आयुक्तः-**

अहो अदा केलेली आहे म्हणजे ४ ठेकेदार बॉडी बांधणारे आणि टाटा कंपनी

**मा. सभापती :-**

गर्व्हमेंट का जो पैसा आया है। ये सामनेवाले ठेकेदार को दिया

**मा. आयुक्तः-**

ठेकेदार याने चार बॉडी बांधनेवाले, बसकी और एक टाटा कंपनी असे ठेकेदार

**मदन उदितनारायण सिंह :-**

दुसरा अपना ये जो केंद्र शासन का पैसा आने मे देर हो रहा है अपने इस के लिए कंन्स्लटंट के लिए कंन्सल्ट को फिज दिया।

**मा. आयुक्त :-**

कंन्सटंट की फी पुरा नही दिया। हमने उसमे कट लिया, क्योकी ३०० गाडी परचेस करनेके उन्होने सँक्शन करके लाने का था। वो कानून से हम कट नही कर पाये लेकीन फिर भी हमने उसको १२ लाख रुपये दिया है। ५० बस ही सॅंगशन करके लाया।

**मदन उदितनारायण सिंह :-**

तो ५० बसका पैसा दिया ना।

**मा. आयुक्तः-**

५० बस का ही पैसा दिया है। उसको हमने लेटर लिखा है। केंद्र शासन का बजेट सत्र चालू था। इसिलिए रिॲप्रपेशन करने का बॅलन्स था। इसिलिए सबका पैसा रोका हुआ है।

**जुबेर इनामदार :-**

साहेब, तो ही अनुदान आपल्याला केंद्र शासनाकडून येणार आहे ना? जे आपण कंन्सल्टंटला देणार

**मदन उदितनारायण सिंह :-**

जब आपने पैसा दिया है तो पुछ सकते हैना देर क्यो हो रहा है?

**मा. आयुक्त :-**

तो पण इन्क्लूड करूनच मिळणार ना.

**याकुब कुरेशी :-**

त्याला पैसेच नव्हते, द्यायला पाहिजे होते १२ लाख दिले आपण

**मा. आयुक्त :-**

त्याची फी होती ८८ लाख रुपये.

**याकुब कुरेशी :-**

३०० बसेस आणून देईल तेव्हा.

**मा. आयुक्त :-**

ॲग्रीमेंट असं केलेल आहे पूर्वी की, ३०० बसचे त्यांनी डीपीआर बनवायचे आणि किती मंजूर होते त्याचा काही संबंध नाही पूर्ण रक्कम द्यायची आम्ही म्हटले देणार नाही आम्ही १२ लाखच रुपये दिले त्यांना

**मदन उदितनारायण सिंह :-**

ॲग्रीमेंट ऐसा नही था। ॲग्रीमेंट ऐसा था जितना बस लाऐंगे उतने बसका उनको

**मा. आयुक्तः-**

ॲग्रीमेंटमे ऐसा नही है। ॲग्रीमेंटमे फुल रक्कम देने का था लेकिन हमने माना नही और १२ लाख रुपयाही दिया उनको

**मदन उदितनारायण सिंह :-**

५० बसका दिया ना ।

**मा. आयुकत :-**

५० बसका ही दिया है। और वो भी हम पिछे पडे थे की, सब बस सॅगशन करके लाओ फीर लेके जाओ। परसो चार लाख रुपया दिया चार दिन पहले।

**मदन उदितनारायण सिंह :-**

जब हम पैसा दे रहे है तो अपना पैसा आने मे लेट हो रहा है तो हम पूछ सकते है ना क्यो

**मा. आयुक्तः-**

इसिलिए उनको पुछा ना पेमेंट करने के बाद उसको रिमांयन्डर किया तो उन्होने बोला की, आठ दस दिन मे हम रिलिज करनेके लिए जाऊंगा उधर।

**शरद पाटील :-**

साहेब, त्या सिक्युरीटीचे काय करावे, आता ते विचारले होते काय झालं किती आहे, बँक गॅरंटी

**मा. आयुक्तः-**

४२ लाख ५० हजार सिक्युरीटी डिपॉझिट आहे. २१ लाख ५० हजार रोखमध्ये आणि २१ लाख ५० हजार बँक गॅरंटीमध्ये

**जुबेर इनामदार :-**

जमा केली का ठेकेदाराने, जरा माहिती घ्या केले नव्हते

**मा. आयुक्तः-**

नाही, ४२ लाख ५० हजाराचीच त्यांच्याकडून सिक्युरिटी घ्यायची होती. त्यापैकी २१ लाख ५० हजार रोख आणि २१ लाख ५० हजार बँक गॅरंटी

**जुबेर इनामदार :-**

साहेब ते २१ लाख ५० हजार त्यांनी जमा केले नव्हते. ती फक्त माहिती घ्या त्याची

**मा. आयुक्तः-**

२१ लाख ५० हजार आलेले आहेत काय? आहे ना पासबुक दाखवा त्यांना

**अनिल सावंत :-**

मग ते वापरा ना

**मा. आयुक्तः-**

ते कसे वापरणार? ४ कोटी ९४ लाख.

**अनिल सावंत :-**

आयुक्त साहेब, ते पण वापरा.

**प्रविण पाटील :-**

आयुक्त साहेब, पी.पी.पी. च्या योजनेअंतर्गत आपण काही रक्कम ठेवतोय शासनाच्या जी.आर. नुसार आपण ठेवतो ना.

**मा. आयुक्त :-**

कुठला?

**प्रविण पाटील :-**

पी.पी.पी.पी. योजना, पी.पी.पी.पी.साठी आर्थिक मंजूरी.

**मा. आयुक्त :-**

पी.पी.पी.पी. योजना आपण महासभेत निर्णय घेतला पी.पी.पी.पी. वर राबवा.

**प्रविण पाटील :-**

जर शासनाची अशी अधिसुचना आहे, पी.पी.पी.पी. योजना राबवावी अशी सुचना आहे. त्याच्यामध्ये आपण वर्ग केली तर आपण त्या योजनेमध्ये आपण राबवणार आहे का?

**मा. आयुक्त :-**

पी.पी.पी.पी. योजना यासाठी राबवायची आहे की, महापालिकेचा जो हिस्सा आहे तो कॉन्ट्रॅक्टरने भरावा. केंद्र शासन आपल्याला ५० टक्केच रक्कम देते.

**प्रविण पाटील :-**

नाही ते मान्य आहे. पण मुळ पी.पी.पी.पी. योजना आहे त्याच्यावर काय परिणाम होणार नाही ना.

**मा. आयुक्त :-**

नाही होणार. कारण काय आपण ॲग्रीमेंटमध्ये क्लॉज त्यांना तयार केला आहे की, आता जे ५० बस चालू आहेत त्या बसचे व्हॅल्यूएशन करायचे आहे.

**प्रविण पाटील :-**

नाही करत आहे. प्रत्येक वेळी आपण त्यामध्ये काही रक्कम ठेवतो. पी.पी.पी.पी. मध्ये आणि त्याचा आपण शहरातील गरीब वॉर्ड आहे ते पैसे वापरतात त्यांच्याकडे आपण पैसे वापरतो.

**मा. आयुक्त :-**

कुठली रक्कम?

**प्रविण पाटील :-**

पी.पी.पी.पी. मधील.

**मा. आयुक्त :-**

नाही.

**प्रविण पाटील :-**

२५ टक्के रक्कम काहीतरी म्हणून बजेटमधील ठेवायची असते पी.पी.पी.पी. योजनेत.

**मा. आयुक्त :-**

नाही पी.पी.पी. योजना ही वेगळी आहे. पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशिप म्हणजे खाजगी माणसांना आपण आपल्या बरोबर घेऊन काम करायचे आहे. त्यामध्ये ५० टक्के रक्कम केंद्रशासनाकडून मिळणार आणि ५० टक्के रक्कम बस खरेदीसाठी रक्कम ठेकेदाराने द्यायची आहे. ठेकेदाराने ५.५० कोटी रू. द्यायचे.

**अनिल सावंत :-**

आयुक्त साहेब केंद्रशासनाचे जेएनयुआरएम योजनेअंतर्गत खरेदी केलेल्या बस प्रकल्पाकरिता महानगरपालिका फंडातून तात्पुरत्या कालावधी करिता बस प्रकल्प खात्यात निधी वर्ग करणेबाबत मिरा भाईंदर

महानगरपालिकेने केलेल्या परिवहन सेवेकरिता केंद्रशासनाच्या जे जेएनयुआरएम योजने अंतर्गत ५० नविन बस खरेदी केलेल्या आहेत. सदर बस खरेदी प्रकल्पाकरितासुमारे ९ कोटी ८८ लाख ७८ हजार ८०० इतका खर्च येणारआहे. सदर खर्चाच्या रकमेपैकी ३५ टक्के रक्कम ३ कोटी ४६ लाख ७ हजार ५८० रू. व १५ टक्के रक्कम १ कोटी ४८ लाख ३१ हजार ८२० मिळून रक्कम ४ कोटी ९४ लाख ३९ हजार ४०० अनुक्रमे केंद्र व राज्यशासन अनुदानापोटी देणार आहे. व प्रकल्पाकरिता उर्वरित ५० टक्के रक्कम ४ करोड ९४ लाख ३९ हजार ४०० ही महानगरपालिकेस पी.पी.पी. च्या माध्यमातून उभारण्याची आहे. व त्यास महासभेने ठराव क्र. ५१, दि. ११/०२/२०१० अन्वये मंजूरी दिलेली आहे. प्रकल्पाकरिता केंद्र व राज्यशासनाकडून मिळावयाच्या एकूण अनुदानाच्या रक्कमेपैकी १ करोड ३७ लाख रक्कम प्रकल्प खात्यात जमा झालेली असून सर्व परवानगीने सदर रक्कम कंत्राटदारांना कंत्राटाबाबत आगाऊ रक्कम ॲडव्हान्स अमाऊंट म्हणून अदा केलेली आहे. सद्यस्थिती शासनाकडून मिळावयाच्या अनुदाना रकमेपैकी रक्कम रू. ३ करोड ९८ लाख ३९ हजार ४०० प्राप्त व्हायची आहे व ही रक्कम शासनाकडून टप्प्याटप्याने मिळावयाची आहे. मा. महासभेच्या दिलेल्या मंजूरीच्या अनुषंगाने प्रकल्पाकरिता पी.पी.पी.च्या माध्यामातून कंत्राट नेमून त्यांचेकडून प्रकल्पाकरिता रू. ४ करोड ९४ लाख ३९ हजार ४०० इतकी रक्कम उभारावयाच्या कामाची निविदा जाहिरात तयार आहे. मात्र महाराष्ट्र राज्य विधान परिषदेच्या ठाणे जिल्ह्यातील निवडणूकीकामी क्षेत्रात आचारसंहिता लागू होऊन सदर कामाची व्याप्ती मोठ्या प्रमाणात असल्याने त्यास महिना किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी लागण्याची शक्यता आहे. प्रकल्प कालमर्यादेत पूर्ण करण्याकरिता केंद्र व राज्यशासन यांची भूमिका आग्रही आहे. महानगरपालिकेस पी.पी.पी. च्या माध्यमातून निधी उभारण्यास उशीर झाल्यास शासनाकडून कारवाई होण्यास शक्यता नाकारता येत नाही. बस प्रकल्पाकरिता पी.पी.पी.च्या माध्यमातून महानगरपालिकेस रक्कम उभारण्याच्या कालावधी पर्यंत मनपाच्या मुख्य निधीतून रक्कम ४ करोड ९४ लाख ३९ हजार चारशे रू. इतकी बस प्रकल्पाकरिता युनियन बॅंक ऑफ इंडिया, भाईंदर (प) येथे नव्याने उघडलेल्या प्रकल्प खात्यात वर्ग करणे व पी.पी.पी. च्या माध्यामातून बस प्रकल्पाकरिता खाजगी संस्थांकडून रू. ४,९४,३९,४००/- इतकी रक्कम बस प्रकल्प खात्यात जमा झाल्यानंतर ही रक्कम महानगरपालिकेच्या मुख्य निधीत जमा करण्याच्या प्रस्तावास मा. स्थायी समिती सभा मंजूरी देत आहे.

**जुबेर इनामदार :-**

ह्या ठरावामध्ये उल्लेख करावा की पैसा वर्ग कुठून करता आहे. हा पैसा जो वर्ग करताय तुम्ही तो कुठल्या एफ.डी. मधून तसा करावा लागेल ना. ठराव तसा उल्लेख ठरावात करा ना.

**मा. आयुक्त :-**

नाही, जनरल फंडात जमा करून अदा करणार.

**जुबेर इनामदार :-**

नाही, ठिक आहे साहेब वर्ग करता ना पैसा.

**मा. आयुक्त :-**

जनरल फंडात वर्ग करून अदा करणार.

**जुबेर इनामदार :-**

पैसा वर्ग करताय तो एफ.डी. मोडून करताय ना साहेब, का डायरेक्ट करताय.

**शरद पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने परिवहन सेवेकरिता केंद्र शासनाचा JNNURM योजनेअंतर्गत ५० नवीन बस खरेदी केल्या आहेत. सदर बस खरेदी प्रकल्पाकरिता सुमारे रू. ९,८८,७८,८००/- इतका खर्च येणार आहे. सदर खर्चाच्या रक्कमेपैकी ३५ टक्के रक्कम रू. ३,४६,०७,५८०/- व १५ टक्के रक्कम रू. १,४८,३१,८२०/- मिळून रक्कम रू. ४,९४,३९,४००/- इतकी अनुक्रमे केंद्र व राज्य शासन अनुदानापोटी देणार आहे व प्रकल्प करीताची उर्वरीत ५० टक्के रक्कम रू. ४,९४,३९,४००/- ही महानगरपालिकेस पी.पी.पी. च्या माध्यमातून उभारावयाची आहे व त्यास मा. महासभेने ठराव क्र. ५१, दि. ११/०२/२०१० अन्वये मंजुरी दिलेली आहे.

प्रकल्पा करीता केंद्र व राज्य शासनाकडून मिळावयाच्या एकूण अनुदानच्या रक्कमपैकी रू. १,३७,००,००००/- रक्कम प्रकल्प खात्यात जमा झाली असून पुर्व परवानगीने सदर रक्कम कंत्राटधारकांना कंत्राटाबाबत आगाऊ रक्कम (Advance Amount) म्हणून अदा केली आहे. सद्यस्थितीत शासनाकडून मिळावयाच्या अनुदान रक्कमपैकी रक्कम रू. ३,९८,३९,४००/- अजून प्राप्त व्हावयाची आहे व ही रक्कम शासनाकडून टप्प्याटप्प्याने मिळणार आहे.

उर्वरीत ५० टक्के रक्कम पी.पी.पी. च्या माध्यमातून उभाराण्याची होती. मा. महासभेने दि. ११/०२/२०१० रोजी ठराव केल्यानंतर ही पी.पी.पी. च्या माध्यमातुन कंत्राटधारकांना नेमण्या करीता आता पर्यंत कुठल्याही प्रकारची प्रशासनाने कारवाई केलेली नाही तरी आज मा. स्थायी समितीने रक्कम रू. ४,९४,३९,४००/- बस प्रकल्पा करीता महानगरपालिकेच्या मुख्य निधीतुन वर्ग करण्याच्या प्रस्ताव मंजुरीसाठी आणलेला आहे.

अर्थसंकल्पात वरिल हेड खाली कोणत्याही प्रकारची तरतुद नसतानाही मुख्य लेखापरिक्षक व प्रशासन व तसेच एवढी रक्कम रू. ४,९४,३९,४००/- चा स्थायी समितीला कोणत्याही प्रकारचे अधिकार नसताना बेकायदेशीरपणे विषय मंजुरीस मा. स्थायी समितीने मा. महासभेने मंजुर केलेल्या अर्थ संकल्पात बदल करण्यासाठी सादर केलेला आहे. या प्रकारचा निधी बस प्रकल्पात वर्ग केल्याने इतर विकास कामात निधी अभावी फार मोठा बदल होणार असून विकास कामात अडथळा निर्माण होणार आहे.

तरी या सर्व बाबीत मुख्य लेखापरिक्षक यांना दोषी ठरवून त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करावी व मा. स्थायी समितीने यापुढे मा. महासभेने केलेल्या प्रस्तावात बदल करून मा. महासभेचे अधिकार हिरावून घेऊ नये तसेच हा विषय मा. महासभेच्या अधिकारातला आहे सदर विषय मा. महासभेपुढे सादर करण्यात यावा या प्रकारचा ठराव मी मांडत आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

मा. आयुक्त साहेब, या ठरावात असे नमूद केले आहे की, महानगरपालिकेकडून सेंट्रल गव्हर्नमेंट कडून आपला जो निधी येणार आहे त्याबद्दल आपण काहीच हालचाल केली नाही. दुसरी गोष्ट जो निधी हा स्थायी समितीला अधिकार नाही. कुठल्या कलमा खाली असा काही कलम आपण टाकला आहे का? आपल्याला कुठल्या कलमाखाली अधिकार नाही ह्याबाबत तसा ठराव होण्याआगोदर तसा खुलासा करावा.

**मा. आयुक्त :-**

मुळात केंद्रशासनाकडे रकमेचे प्रयत्न केलेले नाही हे म्हणणे चुकीचे आहे आणि सर्वांत महत्वाचे म्हणजे विकासकामासाठी लागणारा निधी यासाठी वापरू नये म्हणतात. मुळात महापालिकेचा नाही. हा निधी ठेकेदाराच्या सिक्युरिटी डिपॉझीटखाली जमा असलेली रक्कम आहे. ती रक्कम आपण विकास कामासाठी वापरू शकत नाही. ते ठेकेदारने मागणी केल्यानंतर द्यायची रक्कम आहे. त्यामुळे हे म्हणजेच पूर्णपणे चुकीचे आहे. आणि फायनान्सीअल अधिकार आहेत ते स्थायी समितीचे आहेत. महासभेचे नाहीत. महासभेचा प्रशासकिय मान्यता देण्याचा अधिकार आहे. फायन्सन्सीअल ठेवणे, काढणे, देणे याचे संपूर्ण अधिकार स्थायी समितीचा आहे.

**अनिल सावंत :-**

सभापती साहेब, हा जो ठराव मांडलेला आहे.मा. सदस्य शरद पाटील यांनी स्थायी समितीचे अधिकार म्हणजे स्थायी समितीच्या सदस्यांना अधिकार नाहीत म्हणून एक स्थायी समितीचा सदस्यच ठराव मांडतो आहे. हे कितपत योग्य आहे. त्यांनी मुळात स्थायी समिती सदस्यांचे अधिकार काय आहेत किंवा त्यांना किती पॉवर्स आहेत. ह्याची माहिती करून घ्यावी आणि स्थायी समितीच्या सदस्यांना अधिकार नाही. हा स्थायी समिती सदस्य ठराव मांडूच शकत नाही. इतर कोणीतरी मांडला पाहिजे. इतर कुठल्यातरी सभागृहाने मांडला पाहिजे.

**मा. सभापती :-**

मा. आयुक्त साहेब, ठरावामध्ये जर अस नमूद आहे की, स्थायी समितीच्या सदस्यांना अधिकार नाहीत आणि तो ठराव स्थायी समिती सदस्यच मांडतो आहे मग हा ठराव होऊ शकतो का?

**मा. आयुक्त :-**

विरोध आहे हा.

**शरद पाटील :-**

हा ठराव महासभेत झाला होता म्हणून तिथेच जावा अस आमच म्हणण आहे.

**अनिल सावंत :-**

महासभेत जाव म्हणून ठिक आहे. परंतु स्थायी समितीला अधिकार नाही म्हणून तुम्ही काय म्हणू शकता.

**जुबेर इनामदार :-**

आर्थिक दृष्टीने स्थायी समितीलाच अधिकार आहेत ना?

**मा. सभापती :-**

तुम्ही ठराव मांडताय तर असा ठराव मांडू शकता का?

**अनिल सावंत :-**

नाही, मग सदस्य मांडू शकत नाही ना.

**जुबेर इनामदार :-**

शरद पाटील साहेब तुम्ही तो ठराव वाचायच्या आधी वाचला नसेल.

**शरद पाटील :-**

नाही नाही ठराव वाचायच्या आधी वाचलाय आणि ते माझ्या लक्षात आले होते. पण तरी सुध्दा तो महासभेत झालेला ठराव आहे म्हणून तो महासभेपुढे जावा.

**जुबेर इनामदार :-**

पण हा विषय महासभेचा नाहीच आहे. हा आर्थिक विषय आहे. आर्थिक दृष्टीकोनातून स्थायी समितीला अधिकार आहेत ना.

**शरद पाटील :-**

मा. सदस्य जुबेर साहेब झाली माझ्या हातून चूक झाली आहे. जाऊ द्या होऊ द्याना.

**अनिल सावंत :-**

महासभेत ठराव झाला, स्थायी मध्ये झाला तो विषय वेगळा. नाही पण मला अधिकार नाही म्हणून मीच ठराव मांडायचा.

**ग्रिटा फॅरो :-**

ठराव कॅन्सल करा.

**हेलन गोविंद :-**

चुकीचा असेल तर बोलू नका.

**मा. आयुक्त :-**

मा. स्थायी समितीच्या मंजूरीने आयुक्त महापालिकेच्या वतीने सर्व ठेवी ठेवील, गुंतवणूक करील व आयुक्तास तशाच मंजूरीने अशारितीने ठेवलेल्या ठेवी कोणत्याही वेळी काढून घेता येतील स्थायी समितीच्या मंजूरीने.

**जुबेर इनामदार :-**

साहेब माझी फक्त सुचना असेल त्या मुळ ठरावामध्ये.

**अनिल सावंत :-**

सभापती साहेब, हे आता ठराव मांडतील आणि उद्या बोर्ड लावतील परिवहन समितीला पैसे देण्यास आमचा विरोध आहे.

**मा. सभापती :-**

तुम्ही घ्या मांडून द्या. आम्ही दिला ते नाही.

**शरद पाटील :-**

प्रत्येक वेळेला प्रशासन आपल्याला अडचणीत आणत. मध्ये पण ते बाजार लिलावाच केल. विरोध करणार नाही तर काय बघ्याच्या भूमिका घेणार का?

**मा. आयुक्त :-**

काय अडचणीत आणल?

**शरद पाटील :-**

बाजार लिलावाचे पैसे माफ करायला सांगितले त्या विषयाच काय झाले?

**मा. आयुक्त :-**

कुठे काय विषय झाला? आम्ही शासनाला विचारल, चर्चा केली, करता येत नाही.

**शरद पाटील :-**

ठराव झाला होता त्याच काय झाल? तुम्ही असे विषय आणता कशाला?

**मा. आयुक्त :-**

तुमच्या सगळ्यांची इच्छा होती ना.

**शरद पाटील :-**

आमची कोणाची इच्छा नव्हती. तो विषय इथे आणावा. तो आमच्या सदस्यांमध्ये भांडण लावायचा विषय होता.

**मा. आयुक्त :-**

कामकाज करत असताना भांडणाचा प्रश्न कुठे येतो.

**शरद पाटील :-**

मॅडम ने जाऊन सांगितल की, शरद पाटीलने एकट्याने विरोध केला.

**सुधा व्यास :-**

मा. आयुक्त साहेब मी आपल्या परवानगीने बोलते ये सबजेक्ट तो अलग हे लेकीन स्थायी समिती के पास एक वित्त का पुरा अधिकार है। वित्त संबंधी जो भी विषय है वो स्थायी समितीसे जाते है। ये तो एक स्मिप्लसी बात है। आपको तो जादा अनुभव है आपने जो लिया है वो गत निर्णय लिया इसके लिए आप विरोध कर रहे है। उसमे आप वो क्यू लेके आरहे है बोलो हो गया।

**शरद पाटील :-**

नही उन्होने जो बोला इसलिए मैने उदाहरण दिया।

**मा. सभापती :-**

आपण गेल्या स्थायी समितीमध्ये मदनजी शायद पाटीलजी नही थे। वो चौपाटी का आपने भाडे वाढ किया ना उसमे तो दुसरे दिन निषेध निषेध का बोर्ड लगा था। आपने इधर तो विरोध किया उधर तो बोर्ड

लगा दिया। हम नाराज हो गये। स्थायी समितीमें हमारा निर्णय था तो हमने ले लिया हमारे पास आगये वो वैसा वो जो सबजेक्ट देखकर आप लोगोने विरोध किया मधुपुरोहित या आपन झगडा करे हो बात नही.

**याकुब कुरेशी :-**

कदाचित बी.जे.पी सोडून गेला असावा म्हणजे विरोध केला शरद पाटीलांनी.

**शरद पाटील :-**

साहेब चांगले कानमंत्र देतातत्याबद्दल मला वाद नाही. साहेब आहेत म्हणून ही मनपा बरोबर चालते.

**जुबेर इनामदार :-**

हा ठराव होता. ही कुणाची भावना होती.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त सो., ठराव मांडू दे त्यांना मागच्या वेळी सारख व्हायला नको. मागच्या वेळी बोर्ड लागले प्रशासनाचा आणि सदस्यांचा त्यांनी निषेध केला. तसे हे उद्या बोर्ड लावतील.

**मदन उदितनारायण सिंह :-**

हमारी जो भावना थी इसलिए हमने विरोध किया उसमे कुछ गलत नही हुआ है। भावना सबकी है।

**अनिल सावंत :-**

खरी वस्तुस्थिती काय आहे ते लोक लिहिणार नाही.

**मा. आयुक्त :-**

मा. सभापती सो., हा विषय नविन नाही.बजेटला एक विरोध तर बाकीच्या सगळ्यांनी संमती दिली आणि आम्ही मतदान केल नाही म्हणून महासभेत सांगितले. आणि प्रशासनाला अडचणीत आणले आहे. आणि हे म्हणतात की आम्ही प्रशासन अडचणीत आणत आहे. कर वाढीच्या वेळेला सर्वानुमते झाला. नंतर महासभेमध्ये तुम्ही चर्चा करायला लागलात की आम्ही विरोध करायला लागलो म्हणून. म्हणजे तुम्ही प्रशासनाला अडचणीत  आणल आणि परत तुम्ही म्हणता आम्हाला, आम्ही विरोध केला होता म्हणून सांगितले आणि महासभेमध्ये सांगितले आमचा विरोध आहे आणि इथे मात्र सर्व संमत्तीत कर वाढीचा विषय चालला होता. आम्ही अडचणीत आणतो अस दाखवता तुम्ही.

**अनिल सावंत :-**

विरोध कसा काय करता अर्थसंकल्पाच्या ठरावाल तुम्ही अनुमोदक आहात.

**मा. आयुक्त :-**

विरोध फक्त १ मताचा होता. बाकी सगळे जाऊ दे, जाऊ दे मंजूर करा. सर्वांनी शेवटी उठताना सांगितले सर्वानुमते. हरीभाऊ काय सांगा तुम्ही, रेकॉर्डवर आहे. जेव्हा मला महासभेत उत्तर देण नामुश्कील झाली की ही लोक स्थायी समितीमध्ये असताना मतदान केल आणि तिथे मात्र विरोध दाखवायला लागले. प्रशासन अडचणीत आल त्यावेळेला.

**शरद पाटील :-**

एक मताचा कोणाचा विरोध होता.

**याकुब कुरेशी :-**

साहेब जाऊ दे जो विषय नाही त्या विषयावर कशाला वादावाद करता विषयांतर करू नका.

**जुबेर इनामदार :-**

साहबे ज्यांनी चर्चामध्ये विरोध केला त्यांनी ठराव वाचला.

**शरद पाटील :-**

साहेब एक मताचा विरोध कोणाचा होता.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही सगळ्यांनीच उठताना सांगितल की, मतदानाचा ठराव दिला आणि उठताना म्हटल सर्वानुमतचे मंजूर.

**मदन उदितनारायण सिंह :-**

विरोधाचा ठराव मांडला होता.

**मा. आयुक्त :-**

चौघांनी ठराव मांडला होता. नंतर उठताना सांगितल की जाऊ द्या मंजूर करून घ्या.

**शरद पाटील :-**

साहेब एक मताचा विरोध होता हे पहिल्यांदा सांगा.

**मा. आयुक्त :-**

चारही मत शेवटी उठताना तुम्ही दिलीत.

**शरद पाटील :-**

साहेब विरोध आम्हीच केला होता.

**मा. आयुक्त :-**

पाटलांना विचारा, हे आरग्युमेंट करायला लागले तर माझी परत मनस्थिती बिघडेल तुम्ही सर्वानुमते करून घ्या असे म्हटले.

**प्रविण पाटील :-**

साहेब विरोध आम्ही केलेलाच होता. पहिल्यापासून विरोध होता.

**मा. आयुक्त :-**

नाईक साहेबांनी समजावयाला सुरू केली तर माझी मेमरी परत बाजुन जाईल. तुम्ही चर्चा करू नका. तुम्ही स्थायी समितीच्या त्याच खुर्चीवर बसून बोलतात तुम्ही. साहेबांना आरग्युमेंट करायला लावू नका, आम्हाला ऐकवू नका. आमचा विरोध नोंदवा. परंतु नंतर आरग्युमेंट करायला दिल तर आमच मत पण बदलाव लागेल. ठरावाच्या बाजूने असे ओपनली बोललात तुम्ही.

**अनिल सावंत :-**

पाटील साहेब तुमचा विरोध कसा तुम्ही अनुमोदक आहात. बजेटच्या ठरावाला.

**प्रविण पाटील :-**

नाही नाही.

**अनिल सावंत :-**

का नाही. तुम्ही सही करून दिली ठरावावर.

**प्रविण पाटील :-**

फक्त परिवहनच्या ठरावाला आहे. पूर्ण बजेटला नाही. आयुक्त साहेब. परिवहनचा बजेट वेगळा आहे. आयुक्त साहेब परिवहनचा बजेट वेगळा आहे.

**जुबेर इनामदार :-**

फक्त परिवहनचा बजेट होई शकतो का? महापालिकेच्या मूळ बजेट मधूनच पैसे वर्ग होतो परिवहनमध्ये

**मा. आयुक्त :-**

पाटील. साहेबांनीच संमती दिली अनुमेदक आहेत.

**प्रविण पाटील :-**

साहेब आमचा विरोध होता आणि आहे त्या गोष्टीला आणि आरग्युमेंट झाली त्यावर

**मा. आयुक्त :-**

बातम्यापण प्रसिध्द झाल्या. पेपरला आणि तुम्ही त्यावेळी सर्वानुमते करून घ्या असे सांगितले.

**प्रविण पाटील :-**

सर्वानुमते लिहिल गेल ठरावामध्ये आम्ही बोलले. नाही, ठिक आहे चला.

**मा. आयुक्त :-**

अनुमोदक म्हणून सही आहे.

**प्रविण पाटील :-**

साहेब, अनुमोदक फक्त परिवहनच्याला आहे. आणि आमची सुचनापण त्यावेळी घेतली नाही. माझ मत बोललो नाही जाऊ द्या. आमच्या सुचना होत्या त्या तरी घेतल्या का ठरावाला.

**मा. सभापती :-**

संमती मिळाली ठीक आहे.

**प्रविण पाटील :-**

नाही, कसं आहे तुम्ही घेत नाही आणि नंतर आयुक्त साहेब बोलतात. आमची या ठरावाला सूचना होती ती घेतली का? कुठल्या बरोबर आम्ही तो ठराव मंजूर केला.

**मा. आयुक्त :-**

वाद असा होता की नगरसेवक निधी आणि प्रभाग निधी बंद करायच त्यावेळी म्हटले जाऊ दे करू घ्या म्हणून.

**प्रविण पाटील :-**

बजेटच्या पुस्तकात आमची सुचनापण नव्हती कॅसेट बघा आमची सुचना आहे. सुचनापण मांडली नाही.

**मा. आयुक्त :-**

सह्या बघा.

**प्रविण पाटील :-**

सह्यांच नाही साहेब सुचनेसह मंजूर झाले आहे. सुचना होत घेत नाही. तुमच्या पध्दतीने तुम्ही करून घेता.

**मा. सभापती :-**

आता जी चर्चा आहे सचिव साहेब गोषवाऱ्यात मिनिटस मध्ये घेऊ नका. ठराव मतासाठी घ्या.

**प्रविण पाटील :-**
चुकीचा नाही बरोबर आहे. स्थायी समितीचा अधिकार काय आहे ते सांगावा.
**अनिल सावंत :-**
ह्या परिवहन सेवेला यांच्या ठरावाप्रमाणे चाललो तर.
**मा. आयुक्त :-**
बसचा रूठ मंजूर करायला तुम्हीच जाणार आणि उद्घाटन तुम्हीच करणार.
**जुबेर इनामदार :-**
सन्मा. सदस्य पाटील साहेब, आज आपण याला मान्यता नाही दिली तर तेवढा आपल्याला उशीर होणार आहे. बस उशीरा येतील.
**अनिल सावंत :-**
यांच्या ठरावाप्रमाणे गेलो तर ह्या नवीन ५० बस शहरामध्ये येणारच नाहीत.
**मा. आयुक्त :-**
बस येणारच नाही ही व्यवस्था आहे ती.
**प्रविण पाटील :-**
याकुब साहेब, विषय असा आहे तुम्ही समजूनच घेत नाही. हे काम आपण वर्ग करण्यासाठी घेतल आहे का? केंद्र शासनाच काम आहे निधी केंद्रशासनाचा होताना.
**जुबेर इनामदार :-**
निधी नाही आणणार अस कोण बोलले
**प्रविण पाटील :-**
इतर ठिकाणी निधी आला, आणि आपल्याकडेच का आला नाही. आपण का मागे पडतो,
**शरद पाटील :-**
वसुलीसाठी का मागे पडतो.
**प्रविण पाटील :-**
ठेकेदारांची डिपॉझिट घेता उद्या त्यांनी मागणी केली तर.
**शरद पाटील :-**
कमिशनर साहेब, एखाद कुठे काही झाल तर तेवढ खापर बरोबर आपल्याला फोडतात. आम्ही बसला विरोध करतो का?
**मा. आयुक्त :-**
बसलाच विरोध आहे ना, मग कशाला विरोध आहे.
**प्रविण पाटील :-**
बसला विरोध नाही साहेब, ज्या पध्दतीने तुम्ही.....
**मा. आयुक्त :-**
आम्ही मंजुरी मागितली तुमची.
**ग्रिटा फॅरो :-**
जर भांडत राहिलात तर बसेस कशा येणार.
**प्रविण पाटील :-**
मा. आयुक्त साहेब उद्या ठेकेदाराने मागणी केली त्यांची डिपॉझिट आपण वर्ग करतोय तर त्यांना कुठल्या पध्दतीन देणार आपण.
**मा. आयुक्त :-**
देणार नाही.
**प्रविण पाटील :-**
त्याची मुदत असेल ना?
**मा. आयुक्त :-**
देणार नाही.
**प्रविण पाटील :-**
डिपॉझिट त्यांची आहे ना ती , त्यांना द्यायला नको.
**मा. आयुक्त :-**
तो कलम मी सांगणार नाही. पण ते पैसे देणार नाही.
**अनिल सावंत :-**
ठेकेदारांची बाजू तू कशाला घेतो. आयुक्त सांगतांना देणार नाही म्हणून प्रश्न मिटला डिपॉझिट आहे.

**जुबेर इनामदार :-**

तो प्रशासनाचा प्रश्न आहे. तो तुमचा आणि आमचा नाही. उद्या प्रशासनाला विचारतील त्यांनी पैसे प्रशासनाकडे दिलेले आहेत.

**प्रविण पाटील :-**

आपण त्यांची डिपॉझिट वर्ग करतोय.

**जुबेर इनामदार :-**

आपल्याला सुखसुविधा देणे, शहरातील लोकांना सोयीसुविधा देणे हे आपल कर्तव्य आहे. ठेकेदाराला पैसे देणे न देणे हा प्रशासनाची बाजू आहे. ते प्रशासन बघून घेईल.

**प्रविण पाटील :-**

डिपॉझिट म्हणून रक्कम आहे ती.

**अनिल सावंत :-**

ठेकेदार आले का तुमच्याकडे मग विषय मिटला ना. एवढी वर्ष पडलेत ना.

**याकुब कुरेशी**

ठेकेदाराला साहेब सांगितल की, दहा दिवसानंतर देईन संपला विषय.

**मा. सभापती :-**

हरिभाऊ विषय, ठराव मतास घ्या.

**नगरसचिव :-**

प्रकरण २० करिता दोन ठराव आले आहेत. पहिला ठराव सुचक अनिल सावंत, अनुमोदक ग्रिटा फॅरो दुसरा ठराव सुचक शरद पाटील अनुमोदक मदन उदितनारायण सिंह अनुक्रमे मी दुसऱ्या ठरावाचे वाचन करून ठराव मी मतास टाकतोय. सुचक शरद पाटील अनुमोदक मदन सिंह या ठरावाच्या बाजूने असणाऱ्यांनी हातवर करायचे आहे, मिरा भाईंदर महानगरपालिकेने परिवहन सेवेकरिता केंद्र शासनाचा JNNURM योजनेअंतर्गत ५० नवीन बस खरेदी केल्या आहेत. सदर बस खरेदी प्रकल्पाकरिता सुमारे रू. ९,८८,७८,८००/- इतका खर्च येणार आहे. सदर खर्चाच्या रक्कमेपैकी ३५ टक्के रक्कम रू. ३,४६,०७,५८०/- व १५ टक्के रक्कम रू. १,४८,३१,८२०/- मिळून रक्कम रू. ४,९४,३९,४००/- इतकी अनुक्रमे केंद्र व राज्य शासन अनुदानापोटी देणार आहे व प्रकल्प करीताची उर्वरीत ५० टक्के रक्कम रू. ४,९४,३९,४००/- ही महानगरपालिकेस पी.पी.पी. च्या माध्यमातून उभारावयाची आहे व त्यास मा. महासभेने ठराव क्र. ५१, दि. ११/०२/२०१० अन्वये मंजुरी दिलेली आहे.

प्रकल्पा करीता केंद्र व राज्य शासनाकडून मिळावयाच्या एकुण अनुदानच्या रक्कमपैकी रू. १,३७,००,००००/- रक्कम प्रकल्प खात्यात जमा झाली असून पुर्व परवानगीने सदर रक्कम कंत्राटधारकांना कंत्राटाबाबत आगाऊ रक्कम (Advance Amount) म्हणून अदा केली आहे. सद्यस्थितीत शासनाकडून मिळावयाच्या अनुदान रक्कमपैकी रक्कम रू. ३,९८,३९,४००/- अजून प्राप्त व्हावयाची आहे व ही रक्कम शासनाकडून टप्प्याटप्प्याने मिळणार आहे.

उर्वरीत ५० टक्के रक्कम पी.पी.पी. च्या माध्यमातून उभाराण्याची होती. मा. महासभेने दि. ११/०२/२०१० रोजी ठराव केल्यानंतर ही पी.पी.पी. च्या माध्यमातुन कंत्राटधारकांना नेमण्या करीता आता पर्यंत कुठल्याही प्रकारची प्रशासनाने कारवाई केलेली नाही तरी आज मा. स्थायी समितीने रक्कम रू. ४,९४,३९,४००/- बस प्रकल्पा करीता महानगरपालिकेच्या मुख्य निधीतुन वर्ग करण्याच्या प्रस्ताव मंजुरीसाठी आणलेला आहे.

अर्थसंकल्पात वरिल हेड खाली कोणत्याही प्रकारची तरतुद नसतानाही मुख्य लेखापरिक्षक व प्रशासन व तसेच एवढी रक्कम रू. ४,९४,३९,४००/- चा स्थायी समितीला कोणत्याही प्रकारचे अधिकार नसताना बेकायदेशीरपणे विषय मंजुरीस मा. स्थायी समितीने मा. महासभेने मंजुर केलेल्या अर्थ संकल्पात बदल करण्यासाठी सादर केलेला आहे. या प्रकारचा निधी बस प्रकल्पात वर्ग केल्याने इतर विकास कामात निधी अभावी फार मोठा बदल होणार असून विकास कामात अडथळा निर्माण होणार आहे.

तरी या सर्व बाबीत मुख्य लेखापरिक्षक यांना दोषी ठरवून त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करावी व मा. स्थायी समितीने यापुढे मा. महासभेने केलेल्या प्रस्तावात बदल करून मा. महासभेचे अधिकार हिरावून घेऊ नये तसेच हा विषय मा. महासभेच्या अधिकारातला आहे सदर विषय मा. महासभेपुढे सादर करण्यात यावा या प्रकारचा ठराव मी मांडत आहे. ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. हातखाली घेणे पहिला ठराव मतास टाकतो. मिरा भाईंदर महानगरपालिकेने परिवहन सेवेकरिता केंद्र शासनाच्या JNNURM योजने अंतर्गत ५० नवीन बस खरेदी केल्या आहेत. सदर बस खरेदी प्रकल्पाकरीता सुमारे रू. ९,८८,७८,८००/- इतका खर्च येणार आहे. सदर खर्चाच्या रक्कमेपैकी ३५ टक्के रक्कम रू. ३,४६,०७,५८०/- व १५ टक्के रक्कम रू. १,४८,३१,८२०/- मिळून रक्कम रू. ४,९४,३९,४००/- इतकी अनुक्रमे केंद्र व राज्य शासन अनुदानापोटी देणार आहे व प्रकल्प करीताची उर्वरीत ५० टक्के रक्कम रू. ४,९४,३९,४००/- ही महानगरपालिकेस पी.पी.पी. च्या माध्यमातून उभारावयाची आहे व त्यास मा. महासभेने ठराव क्र. ५१, दि. ११/०२/२०१० अन्वये मंजुरी दिलेली आहे.

प्रकल्पा करीता केंद्र व राज्य शासनाकडून मिळावयाच्या एकूण अनुदानाच्या रक्कमेपैकी रू. १,३७,००,०००/- रक्कम प्रकल्प खात्यात जमा झाली असून सर्व परवानगीने सदर रक्कम कंत्राटधारकांना कंत्राटाबाबत आगाऊ रक्कम (Advance Amount) म्हणून अदा केली आहे. सद्यस्थितीत शासनाकडून मिळावयाच्या अनुदान रक्कमेपैकी रक्कम रू. ३,९८,३९,४००/- अजून प्राप्त व्हावयाची आहे व ही रक्कम शासनाकडून टप्प्या-टप्प्याने मिळणार आहे.

मा. महासभेने दिलेल्या मंजुरीच्या अनुषंगाने प्रकल्पाकामी पी.पी.पी. च्या माध्यमातुन कंत्राटदार नेमून त्यांचेकडून प्रकल्पाकरीता रू. ४,९४,३९,४००/- इतकी रक्कम उभारावयाच्या कामाची निविदा जाहिरात तयार करणे, मात्र महाराष्ट्र राज्य विधानपरिषदेच्या ठाणे जिल्ह्यातील निवडणूकीकामी क्षेत्रात आचार संहिता लागु होती व सदर कार्यवाहीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात असल्याने त्यास किमान महिना किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी लागण्याची शक्यता आहे. प्रकल्प कालमर्यादेत पूर्ण करण्याकरिता केंद्र व राज्य शासन यांची भूमिका आग्रही आहे. महानगरपालिकेस, पी.पी.पी. च्या माध्यमातुन निधी उभारण्यास उशीर झाल्यास शासनाकडून कार्यवाही होण्याची शक्यता नाकारता येत नाही. बस प्रकल्पाकरीता पी.पी.पी. च्या माध्यमातुन महानगरपालिकेस रक्कम उभारण्याच्या कालावधीपर्यंत महानगरपालिकेच्या मुख्य निधीतुन रक्कम रू. ४,९४,३९,४००/- इतकी बस प्रकल्पाकरीता **"युनियन बॅंक ऑफ इंडिया"** भाईंदर (प.) शाखा येथे नव्याने उघडलेल्या प्रकल्प खात्यात वर्ग करणे व पी.पी.पी. च्या माध्यमातुन बस प्रकल्पा करिता खाजगी संस्थाकडून रक्कम रू. ४,९४,३९,४००/- इतकी बस प्रकल्प खात्यात जमा झाल्यानंतर ती रक्कम महानगरपालिकेच्या मुख्य निधीत जमा करण्याच्या प्रस्तावास मा. स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

सुचक अनिल सावंत ठरावाच्या बाजुने असणाऱ्यांनी हातवर करायचे आहेत, ठरावाच्या विरोधात असणाऱ्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य अनिलजी सावंत यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ११ मतदान झालेले आहेत. शरद पाटीलच्या ठरावाच्या बाजूने ४ मत पडलेली आहेत. ११ विरुध्द ४ मतांची अनिल सावंत यांचा ठराव मंजूर होत आहे.

**प्रकरण क्र. २१ :-**

केंद्र शासनाच्या (JNNURM) योजनेअंतर्गत खरेदी केलेल्या बस प्रकल्पाकरीता महानगरपालिका फंडातून तात्पुरत्या कालावधीकरीता बस प्रकल्प खात्यात निधी वर्ग करण्याबाबत.

**ठराव क्र. १९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने परिवहन सेवेकरिता केंद्र शासनाच्या JNNURM योजने अंतर्गत ५० नवीन बस खरेदी केल्या आहेत. सदर बस खरेदी प्रकल्पाकरीता सुमारे रू. ९,८८,७८,८००/- इतका खर्च येणार आहे. सदर खर्चाच्या रक्कमेपैकी ३५ टक्के रक्कम रू. ३,४६,०७,५८०/- व १५ टक्के रक्कम रू. १,४८,३१,८२०/- मिळून रक्कम रू. ४,९४,३९,४००/- इतकी अनुक्रमे केंद्र व राज्य शासन अनुदानापोटी देणार आहे व प्रकल्प करीताची उर्वरीत ५० टक्के रक्कम रू. ४,९४,३९,४००/- ही महानगरपालिकेस पी.पी.पी. च्या माध्यमातून उभारावयाची आहे व त्यास मा. महासभेने ठराव क्र. ५१, दि. ११/०२/२०१० अन्वये मंजुरी दिलेली आहे.

प्रकल्पा करीता केंद्र व राज्य शासनाकडून मिळावयाच्या एकूण अनुदानाच्या रक्कमेपैकी रू. १,३७,००,०००/- रक्कम प्रकल्प खात्यात जमा झाली असून सर्व परवानगीने सदर रक्कम कंत्राटधारकांना कंत्राटाबाबत आगाऊ रक्कम (Advance Amount) म्हणून अदा केली आहे. सद्यस्थितीत शासनाकडून मिळावयाच्या अनुदान रक्कमेपैकी रक्कम रू. ३,९८,३९,४००/- अजून प्राप्त व्हावयाची आहे व ही रक्कम शासनाकडून टप्प्या-टप्प्याने मिळणार आहे.

मा. महासभेने दिलेल्या मंजुरीच्या अनुषंगाने प्रकल्पाकामी पी.पी.पी. च्या माध्यमातुन कंत्राटदार नेमून त्यांचेकडून प्रकल्पाकरीता रू. ४,९४,३९,४००/- इतकी रक्कम उभारावयाच्या कामाची निविदा जाहिरात तयार करणे, मात्र महाराष्ट्र राज्य विधानपरिषदेच्या ठाणे जिल्ह्यातील निवडणूकीकामी क्षेत्रात आचार संहिता लागु होती व सदर कार्यवाहीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात असल्याने त्यास किमान महिना किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी लागण्याची शक्यता आहे. प्रकल्प कालमर्यादेत पूर्ण करण्याकरिता केंद्र व राज्य शासन यांची भूमिका आग्रही आहे. महानगरपालिकेस, पी.पी.पी. च्या माध्यमातुन निधी उभारण्यास उशीर झाल्यास शासनाकडून कार्यवाही होण्याची शक्यता नाकारता येत नाही. बस प्रकल्पाकरीता पी.पी.पी. च्या माध्यमातुन महानगरपालिकेस रक्कम उभारण्याच्या कालावधीपर्यंत महानगरपालिकेच्या मुख्य निधीतुन रक्कम रू. ४,९४,३९,४००/- इतकी बस प्रकल्पाकरीता **"युनियन बॅंक ऑफ इंडिया"** भाईंदर (प.) शाखा येथे नव्याने उघडलेल्या प्रकल्प खात्यात वर्ग करणे व पी.पी.पी. च्या माध्यमातुन बस प्रकल्पा करिता खाजगी संस्थाकडून रक्कम रू. ४,९४,३९,४००/- इतकी बस प्रकल्प खात्यात जमा झाल्यानंतर ती रक्कम महानगरपालिकेच्या मुख्य निधीत जमा करण्याच्या प्रस्तावास मा. स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. अनिल दिवाकर सावंत** **अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

| ठरावाच्या बाजुने | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|
| १) श्री. दिनेश नलावडे<br>२) श्री. अनिल दिवाकर सावंत<br>३) श्री. याकुब इस्माईल कुरेशी<br>४) श्री. जुबेर इनामदार<br>५) श्री. चंद्रकांत मोदी<br>६) श्री. चंद्रकांत म्हात्रे<br>७) श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद<br>८) श्रीम. ग्रिटा फॅरो<br>९) श्रीम. निर्मला सावळे<br>१०) श्रीम. सुधा व्यास<br>११) श्रीम. अनिता पाटील | १) श्री. शरद पाटील<br>२) श्री. मदन उदितनारायण सिंह<br>३) श्री. प्रविण पाटील<br>४) श्रीम. वर्षा भानुशाली | निरंक |

**ठराव बहुमताने मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण २२ भाईंदर (पूर्व) गोडदेव ज्योती पार्क मागील व भाईंदर (प.) ॲटलॅक हॉटेल मागील धोकादायक शौचालय तोडणेस मान्यता देणेबाबत.

**शरद पाटील :-**

तोडणार म्हणजे परत बनवणार का तिथे, दोन्ही ठिकाणी.

**दिपक खांबीत :-**

दोन्ही ठिकाणी बनवणार.

**शरद पाटील :-**

जागा देणार नाहीना कोणाला ते नमूद करा ठरावात, तोडून परत बनवणार.

**प्रविण पाटील :-**

धोकादायकचा विषय आपण आणतो का इथे प्रत्येक इमारत किंवा प्रत्येक धोकादायक वास्तु आहे त्या

**अनिल सावंत :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत भाईंदर (पूर्व) येथे ज्योती पार्क मागील जागेत चार गाळ्याचे शौचालय आहे. सदर शौचालय हे खुप जुने असून सदर शौचालयास मोठ्या प्रमाणावर तडे व भेगा गेलेल्या आहेत. ठिकठिकाणी प्लास्टर कोसळून लोखंड उघडे झालेले आहे. सदर शौचालय दुरुस्ती होऊ शकत नाही व सद्यस्थितीत वापरात नाही. तसेच भाईंदर (प.) गीतानगर येथे ॲटलॅक हॉटेल मागे पाच गाळ्याचे एक शौचालय ग्रामपंचायत कालावधीपासून बांधण्यात आलेले असून सदर शौचालय मोडकळीस आलेल आहे.

वरील दोन्ही शौचालय तोडण्यास मान्यता देण्यात येत आहे तसेच गोडदेव येथे नविन शौचालय बांधण्यास व ॲटलॅक हॉटेल मागे मुतारी बांधण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**ग्रिटा फॅरो :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

विषय सर्वानुमते मंजूर, सचिव साहेब पुढील विषय घेण्यात यावा.

**प्रकरण क्र. २२ :-**

भाईंदर (पूर्व) गोडदेव ज्योती पार्क मागील व भाईंदर (प.) ॲटलॅक हॉटेल मागील धोकादायक शौचालय तोडणेस मान्यता देणेबाबत.

**ठराव क्र. २० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत भाईंदर (पूर्व) येथे ज्योती पार्क मागील जागेत चार गाळ्याचे शौचालय आहे. सदर शौचालय हे खुप जुने असून सदर शौचालयास मोठ्या प्रमाणावर तडे व भेगा गेलेल्या आहेत. ठिकठिकाणी प्लास्टर कोसळून लोखंड उघडे झालेले आहे. सदर शौचालय दुरुस्ती होऊ शकत नाही व सद्यस्थितीत वापरात नाही. तसेच भाईंदर (प.) गीतानगर येथे ॲटलॅक हॉटेल मागे पाच गाळ्याचे एक शौचालय ग्रामपंचायत कालावधीपासून बांधण्यात आलेले असून सदर शौचालय मोडकळीस आलेल आहे.

वरील दोन्ही शौचालय तोडण्यास मान्यता देण्यात येत आहे तसेच गोडदेव येथे नविन शौचालय बांधण्यास व ॲटलॅक हॉटेल मागे मुतारी बांधण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. अनिल सावंत** **अनुमोदक :- श्रीम. ग्रिटा फॅरो**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २३, निविदा मंजूरी मिळणेबाबत, पाणी पुरवठा विभाग

**चंद्रकांत मोदी :-**

सभापती साहेब पाणी पुरवठाने जो वसुली अच्छा किया है। इसके लिए संबंधी अधिकारी बारकुंड साहब और कमिशनर साहब का भी मै अभिनंदन करता हूँ।

**जुबेर इनामदार :-**

किती टक्के केली आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

९० टक्के केलेली आहे.

**जुबेर इनामदार :-**

सन्मा. सदस्य मोदी साहेबांनी विषय सुरू होताच आणला म्हणजे पाणीपुरवठा विभागाने वसुली यावर्षी चांगली केलेली आहे.

**मा. सभापती :-**

९५ नाही मला वाटते ८० टक्के आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

९३.१८ टक्के आहे.

**जुबेर इनामदार :-**

कधी पर्यंत म्हणजे मार्च पर्यंत का? पाणी पुरवठा विभाग त्यांचे अधिकारी आणि मा. कमिशनर साहेबांचा स्थायी समिती अभिनंदन करते. एक चांगल काम केले आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

दुसरा भी है साहब जो ऐरया मे कनेक्शन देना है वो नगरसवेकको साथ मे लेकर देते है।

**जुबेर इनामदार :-**

चांगल काम केल हे मोदी साहेबांनी विषय काढला म्हणूनच.

**याकुब कुरेशी :-**

खांबित साहेब, त्यामध्ये आणखी एक संडासाचा उल्लेख करा, फाटक रोडला जे आहे ते संडास एकदम खराब झालेले आहेत. त्याच्या रिपेरिंग समावेश करून घ्या.

**जुबेर इनामदार :-**

सन्मा. सदस्य चंद्रकांत मोदी साहेबांनी मांडलेला अभिनंदन या विषयावर बोलू इच्छितो साहेब, पाणी पुरवठा विभागाने ९३ टक्के वसुली केली असली तरच, बारकुंड साहेबांनी सांगितल्याप्रमाणे पाणी पुरवठा अधिकारी बारकुंडसाहेब, पाणीपुरवठा विभाग, आयुक्त महोदय यांचा सर्वांचा या स्थायी समितीच्या सर्व सदस्यांच्या माध्यमातून अभिनंदन करतो. त्यांनी असच चांगल काम कराव या चालू वर्षातही आणि या ९३ टक्के चा १०० टक्के कसा होईल, आणि जास्तीत जास्त लोकांना पाणी पुरवठा करावा ह्याची मी त्यांना विनंती करतो. लोकांना या शहरामध्ये पाण्याचा जो दररोजचा त्रास झालेला आहे. मध्यंतरीच्या काळात तीन तीन, चार-चार दिवस पाणी पुरवठा खंडीत होता. कदाचित स्टेम अधिकारी त्याला कारणीभूत असावे. मात्र त्यांच्याकडून करू जास्तीत जास्त पाणी उपलब्ध करून घेता येईल त्या अनुषंगाने काम करावे. अशी मी त्यांना विनंती करतो.

**शरद पाटील :-**

साहेब, ३५ एम.एल.डी. मधून किती पाणी आल आपल्याला.

**शिवाजी बारकुंड :-**

आजचा रेकॉर्ड आहे आपला १९ एम.एल.डी. क्रॉस केलेली आहे. जे. एम.आय.डी.सीच १२, एम.एल.डी. येत होत ते आजच रिडिंग आहे. १९ एम.एल.डी. क्रॉस केलेली आहे. आणि हे २०-२२ एम.एल.डी. पर्यंत जाईल.

**जुबेर इनामदार :-**

सन्मा. सभापती साहेब, हा विषय आलेला आहे. म्हणून आपल्याकडे नवीन नळ जोडण्या बंद केलेल्या आहेत आयुक्त साहेब, आपल्याकडे पाणी कमी असल्यामुळे नवीन नळ जोडणी बंद करण्यात आलेली आहे. साहेब माझी अशी सूचना आहे आणि हा विषय साहेब तुम्ही रितसर विषय पत्रिकेवर घेऊनच परत स्थायी समितीवर आणा ह्यानंतर नळ जोडणी करताना त्या वॉर्डच्या नगरसेवकाची तुम्ही नाहरकत दाखला घ्या. होतो का अस साहेब, आम्हीच आमच्या वॉर्डमध्ये पाणी पुरवठा होत नाही म्हणून तक्रार करायची आणि सत्य आहे की पाणी पुरवठा कनेक्शन करता बरेच दलाल ह्या शहरात मिळतात. दलालांचे कामकाज बंद झाल पाहिजे.

**मा. सभापती :-**

सचिव साहेब, पुढच्या मिटींगमध्ये हा विषय घेऊन या.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

पुढच्या मिटींगला घ्या. कारण नगरसेवकांना काही विचारल जात नाही आणि तिथे नळ जोडण्या होतात.

**जुबेर इनामदार :-**

साहेब कोणाची तक्रार राहणार नाही. त्यानंतर जो नगरसेवक ह्याला ना हरकत दाखला देईल तो कारणीभूत ठरेल.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

आता मध्येच मी बारकुंड साहेबांना विचारल होत. बारकुंड साहेब बोलले की, पैसा भरले की नगरसेवकाला विचारायची आवश्यकता नाही.

**मा. सभापती :-**

म्हात्रे साहेब, हा विषय घेतल्यानंतर चर्चा करू.

**मा. आयुक्त :-**

पुढच्या मिटींगमध्ये घेऊ. पण महाराष्ट्रात तस नाही आहे. नगरसेवकांची संमती.

**जुबेर इनामदार :-**

साहेब नसले तरी ती आपण धोरण ठरवू शकतो.

**ग्रिटा फॅरो :-**

साहेब तसच पानपट्टे साहेबांनी ..........

**मा. आयुक्त :-**

महाराष्ट्रात कधी अस घडल नाही. ते करायच असेल तर तुम्ही बघा. परंतु महाराष्ट्रात अस कुठेच नाही कि त्या वॉर्डच्या नगरसेवकांच्या संमतीने करून घ्यावे म्हणून.

**जुबेर इनामदार :-**

साहेब आपल्या महाराष्ट्रामध्ये अशी परिस्थितीच नाही ना ६० तासानंतर पाणी येत.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही काय चर्चा करून निर्णय घ्यायचाय तो घ्या. मी हे सांगून मी सांगितल तुम्हाला साहेब.

**जुबेर इनामदार :-**

तुमची आम्हाला मदत लागेलच ना. तुम्ही ह्यातून बाहेर पडू शकत नाही.

**ग्रिटा फॅरो :-**

साहेब, पानपट्टे साहेबांच्या टीमने देखील अशीच चांगली कामगिरी केलेली आहे. सर्व झोपडपट्टीत जाऊन डॉक्टरांनी घेतलेले लायसन्स अधिकृत नव्हती. तिथे जाऊन दवाखाने होते. ते सिल बंद केले. ह्या बाबत त्यांनी चांगली कामगिरी केलेली आहे. तर मी त्यांच्या बद्दल अभिनंदनाचा ठराव ठेवत आहे. आमच्या स्थायी समिती तर्फे

**अनिल सावंत :-**

बोगस डॉक्टरांच जे केलेले आहे. त्याबद्दल खरोखरच अभिनंदन आहे आणि बोगस डॉक्टरांच्या केसेस केलेल्या आहेत. किती दबाव आला तरी परत घेऊ नका. दुसरी गोष्ट अशी आहे की, शहरात हॉटेल्स आहेत. नवी मुंबई, मुंबई महानगरपालिका मध्ये हे प्रकार घडलेले आहेत. तिथे जे कर्मचारी काम करतात त्यांची रेग्युलर आरोग्य तपासणी होणे फार गरजेच आहे. किंवा फुटपाथ वरच्या उघड्या गाड्या ठेवल्या जातात त्याची तपासणी करणे आरोग्य विभागाने काम करणे गरजेचे आहे. त्यांची तपासणी महापालिकेतर्फे किंवा तिथे जे हॉटेलचे मॅनेजमेंट असतील त्यांना करायला लावण फार गरजेचे आहे. तीसुध्दा स्टेप मला वाटत आरोग्य विभागाने घ्यावी.

**मा. आयुक्त :-**

व्यवस्था करू.

**प्रविण पाटील :-**

आयुक्त साहेब, पावसाळा चालू झाला आहे. शाळा सुरू झाल्या आहेत. आपल्या शिक्षण विभागाकडून गणवेश वाटप असतो तो चार पाच सात महिन्याने चालू होतो. शिक्षण अधिका-यांना विनंती आहे की, त्यांनी

शाळा चालू झाल्या आहेत तर लवकरात लवकर गणवेश वाटप लगेच कराव. तशी सूचना त्यांना द्या. कारण आता दिल्या नंतर ते जानेवारी फेब्रुवारीला देतात. शेवटला विषय घ्या रितसर ठराव घ्या.

**मा. आयुक्त :-**

वर्क ऑर्डर दिलेली आहे. युनिफॉर्म १५-२० दिवसात येतील.

**अनिल सावंत :-**

साहेब त्यामध्ये शिक्षण मंडळाचा आता प्रविण पाटील यांनी विषय काढलाच आहे तर शहरामध्ये एका शाळेने सहावीपासून आता मराठी विषय बंद केलेला आहे मिरा भाईंदर हद्दीतील शाळेने पूर्व मराठी विषय बंद केला आहे जो राज्य शासनाने सक्तीचा केलेला आहे. तर आपली महापालिका त्यावर काय कारवाई करणार आहे. साहेब त्याची चौकशी करून माहिती घ्या. कारण मराठी विषयच जर बंद करणार असतील तर ह्या शहराच दुर्देव आहे.

**मा. आयुक्त :-**

बरोबर

**अनिल सावंत :-**

आर. बी.के. कनकिया शाळा.

**जुबेर ईनामदार :-**

दि.०५/०३/२०१० रोजीच्या दै. लोकमत, दै. फ्रि प्रेस या वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आलेल्या विषयांकीत जाहीर निविदा सुचनेनुसार प्राप्त निविदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१) शांती पार्क मलनिःसारण केंद्राची देखभाल/दुरूस्ती करणे.
(अंदाजित रक्कम रू. १७,९६,५४४/-)

| **ठेकेदाराचे नाव** | **देकार** |
|---|---|
| **मे. ॲकॉर्ड मार्केटींग ॲन्ड सर्व्हिसेस** | **४.५९% ज्यादा वाटाघाटीअंती २.८० % ज्यादा दराने** |
| मे. ग्रॅव्हीट इंजिनिअरींग वर्क्स | ८.००% ज्यादा दराने |
| मे. साईविणा इंटरप्राईजेस | १२.२४% ज्यादा दराने |

२) शांती नगर मलनिःसारण केंद्राची देखभाल/दुरूस्ती करणे.
(अंदाजित रक्कम रू. १८,३४,५४४/-)

| **ठेकेदाराचे नाव** | **देकार** |
|---|---|
| **मे. ॲकॉर्ड मार्केटींग ॲन्ड सर्व्हिसेस** | **४.५९% ज्यादा वाटाघाटीअंती २.८० % ज्यादा दराने** |
| मे. ग्रॅव्हीट इंजिनिअरींग वर्क्स | ८.००% ज्यादा दराने |
| मे. साईविणा इंटरप्राईजेस | १२.२४% ज्यादा दराने |

३) सृष्टी मलनिःसारण केंद्राची देखभाल/दुरूस्ती करणे.
(अंदाजित रक्कम रू. १७,९६,५४४/-)

| **ठेकेदाराचे नाव** | **देकार** |
|---|---|
| **मे. ॲकॉर्ड मार्केटींग ॲन्ड सर्व्हिसेस** | **४.५९% ज्यादा वाटाघाटीअंती २.९० % ज्यादा दराने** |
| मे. ग्रॅव्हीट इंजिनिअरींग वर्क्स | ८.००% ज्यादा दराने |
| मे. साईविणा इंटरप्राईजेस | १२.२४% ज्यादा दराने |

४) शांती नगर सेक्टर ३ मलनिःसारण केंद्राच्या पंपिंग स्टेशनची देखभाल/दुरूस्ती करणे.
(अंदाजित रक्कम रू. १७,७३,४३२/-)

| **ठेकेदाराचे नाव** | **देकार** |
|---|---|
| **मे. ॲकॉर्ड मार्केटींग ॲन्ड सर्व्हिसेस** | **४.५९% ज्यादा वाटाघाटीअंती २.८० % ज्यादा दराने** |
| मे. ग्रॅव्हीट इंजिनिअरींग वर्क्स | ८.००% ज्यादा दराने |
| मे. साईविणा इंटरप्राईजेस | १२.२४% ज्यादा दराने |

५) शांती नगर सेक्टर ८ मलनिःसारण केंद्राच्या पंपिंग स्टेशनची देखभाल/दुरूस्ती करणे.
(अंदाजित रक्कम रू. १७,००,८०८/-)

| **ठेकेदाराचे नाव** | **देकार** |
|---|---|
| **मे. ॲकॉर्ड मार्केटींग ॲन्ड सर्व्हिसेस** | **४.५९% ज्यादा वाटाघाटीअंती २.९० % ज्यादा दराने** |
| मे. ग्रॅव्हीट इंजिनिअरींग वर्क्स | ८.००% ज्यादा दराने |
| मे. साईविणा इंटरप्राईजेस | १२.२४% ज्यादा दराने |

६) मिरा (एम.आय.डी.सी.) येथील पंपिंग स्टेशनची देखभाल/दुरूस्ती करणे.
(अंदाजित रक्कम रू. १७,३८,८०८/-)

| **ठेकेदाराचे नाव** | **देकार** |
|---|---|
| **मे. ॲकॉर्ड मार्केटींग ॲन्ड सर्व्हिसेस** | **४.५९% ज्यादा वाटाघाटीअंती २.९० % ज्यादा दराने** |
| मे. ग्रॅव्हीट इंजिनिअरींग वर्क्स | ८.००% ज्यादा दराने |
| मे. साईविणा इंटरप्राईजेस | १२.२४% ज्यादा दराने |

७) अस्मिता पार्क येथील पंपिंग स्टेशनची देखभाल/दुरूस्ती करणे.
(अंदाजित रक्कम रू. १६,१६,५४०/-)

| **ठेकेदाराचे नाव** | **देकार** |
|---|---|
| **मे. ॲकॉर्ड मार्केटींग ॲन्ड सर्व्हिसेस** | **४.५९% ज्यादा वाटाघाटीअंती २.८० % ज्यादा दराने** |
| मे. ग्रॅव्हीट इंजिनिअरींग वर्क्स | ८.००% ज्यादा दराने |
| मे. साईविणा इंटरप्राईजेस | १२.२४% ज्यादा दराने |

८) जेसल पार्क मलनिःसारण केंद्राची देखभाल/दुरूस्ती करणे.
(अंदाजित रक्कम रू. १८,३४,५४४/-)

| **ठेकेदाराचे नाव** | **देकार** |
|---|---|
| **मे. ग्रॅव्हीट इंजिनिअरींग वर्क्स** | **१.०० % कमी दराने** |
| मे. ॲकॉर्ड मार्केटींग ॲन्ड सर्व्हिसेस | ०.७० % कमी दराने |
| मे. साईविणा इंटरप्राईजेस | १२.२४% ज्यादा दराने |

उपरोक्त कामाचा तुलनात्मक तक्ता पाहता अ.क्र. १ ते ७ च्या कामांकरीता मे. ॲकॉर्ड मार्केटींग ॲन्ड सर्व्हिसेस यांचे दर लघुत्तम आहेत तर अ.क्र. ८ च्या कामाकरीता मे. ग्रॅव्हीट इंजिनिअरींग वर्क्स यांचे दर लघुत्तम आहेत. सबब उपरोक्त लघुत्तम दर वाजवी व रास्त असल्याने सदर निविदा मंजुरीस व याकामी वेळोवेळी येणारी देयके मंजूर करणेस मा. स्थायी समिती सभा मंजूरी देत आहे.

**ग्रिटा फॅरो :-**
सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**
आयुक्त साहेब, हा जो ठराव झालेला आहे एसटीपी मेंटन्सच ह्या विषयावर गेल्या अडीच वर्षापासून मी आपल्याशी पत्र व्यवहार करतोय आपल्याशी भांडतोय तुम्हाला माहीत आहे.

**मा. आयुक्त :-**
आम्ही बघून पण आलो.

**अनिल सावंत :-**
पण तो विषय नाही. विषय एवढाच आहे की, अन्याय कारक पध्दतीने १३ टक्के मेन्टन्स लावलेला आहे. ॲडिशनल तो आपला ठराव झाल्याप्रमाणे

**मा. आयुक्त :-**
तो विषय आज चर्चेचा नाही.

**चंद्रकांत मोदी :-**
साहब लेकिन बहुत लोगोमे ये तकलिफ हुए है। लोगोमे चर्चाका विषय हो गया है।

**चंद्रकांत म्हात्रे**
चर्चा, लोकांना काय झाल आहे, फुकटचे ५ टक्के जास्त जातात.

**अनिल सावंत :-**
तुम्ही  मान्य करा. मग आपण चर्चा करत नाही.

**मा. आयुक्त :-**
नाही, मी काही मान्य करणार नाही.

**अनिल सावंत :-**
महासभेने मान्य केलेले आहे साहेब

**मा. आयुक्त :-**
नाही, मी काही मान्य करणार नाही.

**अनिल सावंत :-**
महासभेने मान्य केलेल आहे साहेब.

**मा. आयुक्त :-**
एस.टी. महामंडळाच्या बसमध्ये बसणे आणि व्हिडिओ कोचमध्ये बसणे ह्यामध्ये फरक आहे.

**जुबेर ईनामदार :-**
व्हिडिओ चालूच नव्हता, ए.सी. बंद होता. कोच मध्ये व्हिडिओच बंद होता.

**मा. आयुक्त :-**
पूर्ण माझ बोलण होऊ द्या ना साहेब.

**अनिल सावंत :-**
अन्यायकारक आहे तर.

**मा. आयुक्त :-**

अन्यायकारक आहे, परंतु आता जे तुम्हाला टेंडर मंजूर करताय, ते फिल्टर करून टाकण्याचे घेताय. आम्ही स्वतः वस्तुस्थिती पाहिल्या नंतर तिथे पंम्पींग आहे. प्रत्येक तिन्ही पाळीमध्ये चारपाच माणस राहिली तरच टेंडर होईल. नाहीतर पंपींग झाल तर दोन दोन तीन तीन लाखावर येईल वर्षाला.

**अनिल सावंत :-**

२ वर्ष पंपींगच झालय ना त्याच पिरिअडसाठी सांगतो.

**मा. आयुक्त :-**

असे कमी करता येत नाही. कारण एखाद्याने नळ कनेक्शन घेतला.

**अनिल सावंत :-**

आपल्या महासभेचा ठराव झालेला आहे. त्यावेळी ८ टक्के लावा ना संपूर्ण शहराबरोबर.

**मा. आयुक्त :-**

साहेब, गायकवाड साहेब असताना या तुमच्या इस्टीमेंट प्रमाणेच पेमेंट झालेल आहे. मधल एकच वर्ष पंपींगच पेमेंट केलेल आहे. वास्तविक जाधव साहेब असतानाच पंपीगच पेमेंट केलेल आहे. गायकवाड साहेब असताना यापेक्षा सव्वा करोड पेमेंट केलेल आहे.

**अनिल सावंत :-**

साहेब ठरावामध्ये सूचना घ्या माझी.

**मा. आयुक्त :-**

ठराव करायचा करा. पण त्याचा काही उपयोग होईल अस मला वाटत नाही.

**अनिल सावंत :-**

त्यासाठी ८ टक्के घ्याना. तुम्ही, साहेब तुम्हाला माहित आहे सर्व.

**मा. आयुक्त :-**

एकूण १५ हजार कनेक्शन्स आहेत. गावामध्ये कनेक्शन १५ हजार आहेत. त्यामध्ये ५ टक्के ला पाणी आल नाही म्हणून पाणीपट्टी कमी करा हे बरोबर नाही.

**अनिल सावंत :-**

तर आम्ही कुठे म्हणतो पूर्ण शहरात जिथे ही फॅसिलिटी .....

**मा. आयुक्त :-**

त्यांच्यात लिपींग तरी केलय ना आपण.

**अनिल सावंत :-**

त्यासाठी ठिक आहे ६ टक्के

**मा. आयुक्त :-**

६ टक्के आपण जनरल ज्यांच्याकडे ड्रेनेजची व्यवस्था केलेली आहे. अंडर ग्राऊंड ड्रेनेजची त्यांना ८ टक्के लावला. पुढे लाभ मिळणार आहे म्हणून आई वडील इंजिनियर झाल्यानंतर मुलगा पोट भरेल अस मुलाला वाढवत असतो तस पुढे अंडर ग्राऊंड ड्रेनेज येणार आहे. म्हणून ८ टक्के आपण देतो आणि ज्यांनी ऑलरेडी सुविधा मिळणे निदान पंपींगची होईना त्यांच्या आजूबाजूला घाण रहात नाही.

**अनिल सावंत :-**

त्यासाठी ६ टक्के घ्याना तुुही. ते कोण नको म्हणतोय बिल्डरला तर काही चार्ज करत नव्हता साहेब.

**मा. आयुक्त :-**

साहेब ज्यांच्याकडून अंडर ग्राऊंड ड्रेनेजची काहीच सुविधा नाही. त्यांना ८ टक्के आणि ज्यांच्याकडे सुविधा आहे. त्यांच ६ टक्के कस होईल.

**अनिल सावंत :-**

८ टक्के अशासाठी लावताय की त्यांच्यासाठी तुम्ही कॅपिटल इन्व्हेस्टमेंट करताय ही इन्व्हेस्टमेंट ऑलरेडी झालेली आहे.

**मा. आयुक्त :-**

त्यातून तो वगळणार नाही कारण बिल्डरने त्या फ्लॅट मधून पैसे घेतले त्याचे. त्यामुळे डायरेक्ट इनडायरेक्ट पडलाच ना.

**अनिल सावंत :-**

बिल्डर जवळ ना. तुम्ही प्लॅन्ट घेतलाच टेकओव्हर केलात ती चालवायची जबाबदारी पालिकेची होती. पालिकेने तो चालवला नाही.

**मा. आयुक्त :-**

त्या सोसायटीची होती. सोसायटीची जबाबदारी महासभेने घेतल्यानंतर, महासभेने उचलली ती घ्यायला नको होती.

**अनिल सावंत :-**

त्या अगोदर सोसायटी चालवतच होती ना.

**मा. आयुक्त :-**

महासभेने उचलायला नको होती त्यांचे अकाऊंट बघा. सोसायटीला आपल्यापेक्षा जास्त खर्च येत होता. त्यावेळी महासभेने अंडरगाऊंड होईपर्यंत घ्यायला नको होती. कारण सोसयटीचा खर्च आपल्यापेक्षा जास्त होत होता.

**अनिल सावंत :-**

महासभेने घेतला तर महासभेने ठराव केला ना. ६ टक्के महासभेच्या विरोधात जाऊन तुम्ही कसा काय निर्णय घेता का.

**मा. आयुक्त :-**

तो ४५१ लावल.

**अनिल सावंत :-**

तो विखंडित झाला का?

**मा. आयुक्तः-**

विखंडीत करत नाही असं कळल्याबरोबर ६ टक्के वर आणतो. प्रयत्न करा हो शासन तुमचं आहे.

**अनिल सावंत :-**

ते तर प्रयत्न करुच पण इथून पाहिजेना

**जूबेर इनामदारः-**

विखंडीत केला का साहेब तो ठराव

**अनिल सावंतः-**

पाठवला आहे अजून झाला नाही विखंडीत. विखंडीत झाल्यानंतर लावाना.

**मा. आयुक्तः-**

विखंडीत झाला नाही पण गर्व्हमेंटल आम्हाला कळवायला पाहिजे.

**जुबेर ईनामदार :-**

महासभेने मान्यता दिली.

**मा. आयुक्त**

गव्हर्नमेंटने कळवायला पाहिजे हे विखंडीत होऊ शकत नाही.

**जुबेर ईनामदार :-**

महासभा सर्वश्रेष्ठ आहे

**अनिल सावंत :-**

८ टक्के कराना साहेब

**मा. आयुक्तः-**

नाही गव्हर्नमेंट

**जुबेर ईनामदार :-**

विखंडीत झाल्यांनतर

**मा. आयुक्तः-**

४५१

**जुबेर ईनामदार :-**

ते केल्यानंतर

**अनिल सावंत :-**

विखंडीत झाल्यानंतर कराना तुम्ही

**मा. आयुक्तः-**

माझ्या प्रस्तावाच्या विरुध्द असतो ती अंमलबजावणी मी करायची नसते

**जुबेर ईनामदार :-**

म्हणजे तुम्ही बोलाल ती पूर्व दिशा.

**मा. आयुक्तः-**

असा त्याचा अर्थ नाही. तुमच्या सांगितलेल्या काही सजेशन चांगल्या असल्या तर मान्य म्हणून सांगतो.

**अनिल सावंत :-**

साहेब, तत्कालीन आयुक्त राजीव जाधव साहेबांनी ऑर्डर पास केली तर ऑर्डर तर बघून घ्या का तिलाही मानणार नाही तुम्ही

**मा. आयुक्तः-**

तपासून बघु.

**अनिल सावंत :-**

तिला ही मानणार नाही तुम्ही, आयुक्तांनी परमिशन दिलेल्या कमानीला तुम्ही परमिशन देऊन टाकतात. त्या विरोधात जाऊ शकत नाही. जे गैर असलं तरी.

**अनिल सावंत :-**

तपासुन बघा आणि फेवरेबल घ्या. आम्ही तुम्हाला जास्त कुठे काय

**मा. सभापती:-**

प्रकरण क्र.२२ सर्वानुमते मंजूर, सचिव साहेब आपण पुढील विषय घ्यावा.

**जुबेर इनामदार :-**

हाऊस टॅक्स आता हा विषय निघाला म्हणून आपण बरीच करवाढ केली आहे. सहा महिन्यामध्ये काढता का घरपट्टी, एकदाच बोजा पडेल लोकांवर घरपट्टीचा, सहासहा महिन्याची काढण्याची सूचना केली होती.

**मा. आयुक्त:-**

संगणक ६-६ महिन्याची बिल निघणार का ५० टक्के ने

**सिमा मिश्रा:-**

वार्षिक बिल काढतो.

**मा. आयुक्त:-**

सहा-सहा महिन्यांनी होईल का?

**सिमा मिश्रा:-**

शक्य आहे.

**अनिल सावंत :-**

साहेब १५० टक्के वाढ आहे. ॲक्च्युअल घरपट्टीला १५० टक्के वाढ झालेली आहे. लोकांना भरायला तेवढी संधी मिळेल. आम्ही लोकहिताचा विचार करतो.

**शरद पाटील :-**

सहा महिन्याची बिल मिळणार नाही. आणि लोकांना पॅनल्टी भरावी लागेल.

**अनिल सावंत :-**

पॅनल्टी लावायचीच नाही. आपली पध्दत आहे तीच चालू ठेवायची.

**मा. आयुक्त:-**

लोक मुंबईमध्ये सर्विस करणारे जास्त असल्यामुळे सहासहा महिन्याने जास्त चांगली वसुली होईल असा त्यांचा अंदाज आहे आणि कायद्यामध्ये पण प्रोव्हिजन आहे सहा-सहा महिन्यांचं.

**शरद पाटील :-**

आपली बिल वाटायलाच सहा महिने लागतात.

**जुबेर इनामदार :-**

आपण ॲडव्हान्स टॅक्स भरले की नाही त्याऐवजी त्यांना सूचना जाईल.

**शरद पाटील :-**

आपले बिल वाटप होईल का सहा महिन्याने

**अनिल सावंत :-**

नाही, होणार नाही. अजून आपलं तांत्रिक झालं आहे का?

**जुबेर इनामदार :-**

साहेब, सोसायटीत एकत्र पाठवाना.

**मा. आयुक्त:-**

नाही मला काही बोलायचे नाही.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, पूर्ण सोसायटीच क्लब करुन एकत्र पाठवा. आपण घरपट्टी पाठवतो ना.

**मा. आयुक्त:-**

सभा कशी चालवायचं थोड सांगा तुमच्या मताशी आम्ही सहमत आहोत. प्रयत्न करतो. यावर्षी नाही तर पुढच्या वर्षी शक्य झालं तर याच वर्षी सहा महिन्यांनी.

**जुबेर इनामदार :-**

सोसायटीच्या नावावर पाठवा.

**मा. आयुक्त:-**

सोसायटीच्या नावावरच केलं आहे या वर्षापासून

**अनिल सावंत :-**

आपलं कॉम्प्यूटरायजेशन झालं आहे का? डिपार्टमेंटच, प्रभाग कार्यालय, टॅक्स कलेक्शन ऑफीस.

**मा. सभापती:-**

सचिव साहेब आपण पुढील विषय घेण्यात यावा.

**सिमा मिश्राः-**

मा. सभापती साहेबांच्या मान्यतेने बोलते, नेटवर्कींग आता पेंडींग आहे.

**अनिल सावंत :-**

मिरा गावच झालं कॉम्प्यूटरायजेशन झालं आहे का?

**सिमा मिश्राः-**

नाही कॉम्प्यूटर घेतलेले आहे, नेटवर्किंग...

**अनिल सावंत :-**

चार महिन्यांपूर्वी तुमच्या उपस्थितीत सांगितले होत, आठ दिवसामध्ये होणार. मिरा गावचं, जे मॅन्युअलि अजून रिसिट फाडतायत. सहा-सहा महिने तुमचे इंट्री होत नाही. त्याबद्दल मी बोललो होतो.

**सिमा मिश्राः-**

साहेब, तिथे नेटवर्किंग...

**मा. आयुक्तः-**

दरवेळी, मागच्या वर्षी पण हेच सांगितलं होतं.

**सिमा मिश्राः-**

आम्ही प्रथम टेंडर काढलं त्यावेळी कोणीही टेंडर भरलेले नाही.

**अनिल सावंत :-**

नाही, नाही, इ-टेंडरींगच म्हणत नाही मी. मिरा गावचं जे ऑफीस आहे तिथे तुम्हाला कॉम्प्यूटरायजेशन रिसिट फाडायला काय अडचण आहे. मॅन्यूअली २-२ चक्रा मारतात लोक दिवस मोडून.

**सिमा मिश्राः-**

मिरा गावला नेटवर्किंग सुविधा उपलब्ध नसल्यामुळे.

**अनिल सावंत :-**

का उपलब्ध नाही? तिथे कोणाचा नेट नाही का?

**मा. आयुक्तः-**

का केली नाही.

**सिमा मिश्राः-**

बी.सी.बी.ली.टी. स्टडी केलेली आहे. आणि टेंडर काढलेले आहे.

**अनिल सावंत :-**

का? त्या एरियामध्ये कोणाजवळ नेट नाही. सर्वांजवळ आहे मी तिथेच राहतो. माझ्या घरी नेट आहे.

**मा. आयुक्तः-**

मागच्या वेळी उत्तर आहे तेच यावेळी आहे. नविन काय आहे?

**अनिल सावंत :-**

प्रोग्रेस काही नाही.

**सिमा मिश्राः-**

टेंडर काढलेले पण कोणताही प्रतिसाद आलेला नाही.

**अनिल सावंत :-**

मग अशा वेळी काय करतो आपण

**मा. आयुक्तः-**

किती वेळा टेंडर काढलं आपण.

**सिमा मिश्राः-**

आता दुसऱ्यांदा काढतोय.

**जूबेर इनामदारः-**

तुम्हा ह्यामध्ये ठेकेदार कशाला पाहिजेत कॉम्प्यूटरायईज करायला तुम्हा ठेकेदार कशाला पाहीजेत.

**अनिल सावंत :-**

आयुक्तांच्या अधिकारात होईल ते. आयुक्तांचे अधिकार १० लाखामध्ये होईल.

**जुबेर इनामदार :-**

आत्ता तुमच्याकडे जे आहे ते ती लोक द्यायला तयार नाही का? नाहीतर त्यांनाही हाकलून लावाना?

**सिमा मिश्राः-**

साहेब, संगणकीकरणामध्ये तीन वेगवेगळे मुद्दे आहेत.

**अनिल सावंत :-**

त्यामध्ये बजेट किती आहे.

**सिमा मिश्राः-**

नेटवर्किंग आहे आणि एक हार्डवेअर आहे.

**जुबेर इनामदार :-**

इथे नेटवर्किंग कोण देतं तुम्हांला. बाकीचं जे केंद्र आहेत त्यावर कोण करत काम. ते करुन द्यायला तयार नाही का?

**सिमा मिश्राः-**

ते देतील त्यांना प्रस्ताव दिलेले आहे.

**जुबेर इनामदार :-**

मग काय प्रॉब्लेम आहे.

**अनिल सावंत :-**

बजेट काय आहे तुमचं?

**सिमा मिश्राः-**

८० लाख

**अनिल सावंत :-**

किती आहे. ८० लाख, रिस्पॉन्स येत नाही अस काही होऊच शकत नाही. रिस्पॉन्स मिळाला पाहीजे.

**जुबेर इनामदार :-**

इथे जो नेटवर्कींग प्रोव्हाईट करतो तो तिथे करायला तयार नाही का? बाईंडिंग करा ना एकाच व्यक्तीला द्या.

**सिमा मिश्राः-**

मा. सभापती साहेबांच्या मान्यतेने बोलते. नेटवर्किंगची प्रथम कार्यवाही २००६-०७ साली झालेली होती. त्यानंतर देखभाल दुरुस्ती आम्ही बघत होतो आणि त्यानंतर मा. स्थायी समिती

**जुबेर इनामदार :-**

२००६-०७ साली झालेली किती वर्षाकरीता झालेली. प्रत्येक वर्षामध्ये तुम्ही काढताना नेटवर्किंगचा ठेका तुम्हाला द्यावा लागत असेल ना.

**सिमा मिश्राः-**

रेंटल बेसिस कनकिया न्यू ऑफीस ५० हजार रेंटल देअर

**जुबेर इनामदार :-**

आम्ही तुम्हाला तिथलं विचारतो.

**अनिल सावंत :-**

कनकियाचं काय कनकियाला रेंटल कशाला देतो आपण ते रेंट कसलं देतो.

**मा. सभापतीः-**

मा. साहेब ज्यावेळी ई-टेंडरींगचा विषय आला होता तेव्हा हयाच विषयावर बोललो अगोदर संपूर्ण नेटवर्किंग तुम्ही बरोबर करा सी.एफ.सीच मग या विषयावर...

**जुबेर इनामदार :-**

साहेब त्यागावामध्ये नेट चालत नाही असं कुठेच नाही.

**अनिल सावंत :-**

आठ दिन में होएगा ऐसा बोला था।

**जुबेर इनामदार :-**

साहेब त्या गावामध्ये नेट चालत असतील कस बोलतात नाही चालत कारण नेटवर्किंग ज्या कंपनीला हे काम देण्यात आलेलं आहे, त्यांना बाकीचे विभाग दिलेले आहे त्यांना कंपलसेशन केलं पाहिजे ना? कि त्यांनीच ते करावं.

**अनिल सावंत :-**

आणखी कुठे फाडतो मॅन्यूअली रिसीट.

**सिमा मिश्राः-**

एल, के, क्यू, मुर्धा, आर, पी, एस, टी.

**अनिल सावंत :-**

एक झालं मिरा गांव, सेकंड काशी,

**जुबेर इनामदार :-**

डॉक्टरच्या भाषेमध्ये बोलू नका गावाचं नांव सांगा.

**अनिल सावंत :-**

काशी, मिरा, मुर्धा...

**सिमा मिश्राः-**

सात लोकेशन झाले.

**अनिल सावंत :-**

सात लोकेशन झालं नाही साहेब आपलं कॉम्प्यूटराईज करुन

**जुबेर इनामदार :-**

साहेब, मॅक्झीमम अनधिकृत बांधकाम आहेत त्या क्षेत्रामध्ये म्हणजे डायरेक्ट टॅक्सेशन तुम्ही किती कष्ट केले तरी फायदा नाही त्याचा बोजा तुमच्या डोक्यावर येईल नंतर

**अनिल सावंत :-**

म्हणून सर्व मॅन्यूअली चालले आहे.

**सिमा मिश्रा:-**

हया सर्व लोकेशनला सर्व कॉम्प्यूटर बिल आम्ही पाठवतो. कलेक्शन फक्त मॅन्यूअल

**अनिल सावंत :-**

कलेक्शनच मेन आहे, कलेक्शनवरच फेरफार होतात, दोन वर्षापूर्वीची रिसीट फाडली जाते.

**जुबेर इनामदार :-**

साहेब तुम्ही यामध्ये लक्ष घाला.

**मा. आयुक्तः-**

कॉम्प्यूटरमध्ये पण बदल करायला लावलेत ते सस्पेंड पण केलेले आहेत. आणिपुढे चौकशी नेमली आहे कोण-कोण दोषी आहे. हायर ऑफीसरपण दोषी असतील तर त्यांच्यावर पण कार्यवाही करु. फायबरचा जो तपासणी करणारा आहे. त्यांनी तपासणी करुन ज्यांची ज्यांची नांव आहेत त्यांच्यावर कारवाई होईल.

**अनिल सावंत :-**

कारवाई करा साहेब, पण ही सात लोकेशन कॉम्प्यूटरायजेशन कधी होणार आहे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, थोडासा वेळ काढून बसा आणि हया विषयावर सविस्तर चर्चा करा.

**चंद्रकांत मोदी :-**

साहेब, तुम्ही स्वतः लक्ष द्या.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, मागे मिरागावचं विचारल होत. तेव्हा सांगतात की, बांधकाम विभागाने प्रॉपर फर्निचर, प्रॉपर खोल्यांची ॲरेंजमेंट करुन दिली नाही म्हणून झालं नाही. आपण एक रुम करु शकत नाही. एवढी वाईट परिस्थिती आहे आपली कॅबिन नाही बांधू शकत एक

**मा. आयुक्त :-**

राऊत साहेब किती दिवसात होईल.

**जुबेर इनामदार :-**

पुढच्या स्थायी समितीच्या मिटींगमध्ये त्याची माहिती पुरवा अहवाल द्या कधी करता कोणाला देता, कशाप्रकारे करता.

**अनिल सावंत :-**

हायकोर्टाच्या ऑर्डरचं उल्लंघन करताय तुम्ही.

**मा. सभापती:-**

पुढील विषय घेण्यात यावा.

**प्रकरण क्र. २३ :-**

निविदा मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. २१ :-**

दि. ०५/०३/२०१० रोजीच्या दै. लोकमत, दै. फ्रि प्रेस या वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आलेल्या विषयांकीत जाहीर निविदा सुचनेनुसार प्राप्त निविदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१) शांती पार्क मलनिःसारण केंद्राची देखभाल/दुरूस्ती करणे.
(अंदाजित रक्कम रू. १७,९६,५४४/-)

| ठेकेदाराचे नाव | देकार |
|---|---|
| **मे. ॲकॉर्ड मार्केटींग ॲन्ड सर्व्हिसेस** | **४.५९% ज्यादा वाटाघाटीअंती २.८० % ज्यादा दराने** |
| मे. ग्रॅव्हीट इंजिनिअरींग वर्क्स | ८.००% ज्यादा दराने |
| मे. साईविणा इंटरप्राईजेस | १२.२४% ज्यादा दराने |

२) शांती नगर मलनिःसारण केंद्राची देखभाल/दुरूस्ती करणे.
(अंदाजित रक्कम रू. १८,३४,५४४/-)

| ठेकेदाराचे नाव | देकार |
|---|---|
| **मे. ॲकॉर्ड मार्केटींग ॲन्ड सर्व्हिसेस** | **४.५९% ज्यादा वाटाघाटीअंती २.८० % ज्यादा दराने** |
| मे. ग्रॅव्हीट इंजिनिअरींग वर्क्स | ८.००% ज्यादा दराने |
| मे. साईविणा इंटरप्राईजेस | १२.२४% ज्यादा दराने |

३) सृष्टी मलनिःसारण केंद्राची देखभाल/दुरूस्ती करणे.
(अंदाजित रक्कम रू. १७,९६,५४४/-)

**ठेकेदाराचे नाव** **देकार**

**मे. ॲकॉर्ड मार्केटींग ॲन्ड सर्व्हिसेस** **४.५९% ज्यादा वाटाघाटीअंती २.९० % ज्यादा दराने**
मे. ग्रॅव्हीट इंजिनिअरींग वर्क्स ८.००% ज्यादा दराने
मे. साईविणा इंटरप्राईजेस १२.२४% ज्यादा दराने

४) शांती नगर सेक्टर ३ मलनिःसारण केंद्राच्या पंपिंग स्टेशनची देखभाल/दुरूस्ती करणे.
(अंदाजित रक्कम रू. १७,७३,४३२/-)

**ठेकेदाराचे नाव** **देकार**

**मे. ॲकॉर्ड मार्केटींग ॲन्ड सर्व्हिसेस** **४.५९% ज्यादा वाटाघाटीअंती २.८० % ज्यादा दराने**
मे. ग्रॅव्हीट इंजिनिअरींग वर्क्स ८.००% ज्यादा दराने
मे. साईविणा इंटरप्राईजेस १२.२४% ज्यादा दराने

५) शांती नगर सेक्टर ८ मलनिःसारण केंद्राच्या पंपिंग स्टेशनची देखभाल/दुरूस्ती करणे.
(अंदाजित रक्कम रू. १७,००,८०८/-)

**ठेकेदाराचे नाव** **देकार**

**मे. ॲकॉर्ड मार्केटींग ॲन्ड सर्व्हिसेस** **४.५९% ज्यादा वाटाघाटीअंती २.९० % ज्यादा दराने**
मे. ग्रॅव्हीट इंजिनिअरींग वर्क्स ८.००% ज्यादा दराने
मे. साईविणा इंटरप्राईजेस १२.२४% ज्यादा दराने

६) मिरा (एम.आय.डी.सी.) येथील पंपिंग स्टेशनची देखभाल/दुरूस्ती करणे.
(अंदाजित रक्कम रू. १७,३८,८०८/-)

**ठेकेदाराचे नाव** **देकार**

**मे. ॲकॉर्ड मार्केटींग ॲन्ड सर्व्हिसेस** **४.५९% ज्यादा वाटाघाटीअंती २.९० % ज्यादा दराने**
मे. ग्रॅव्हीट इंजिनिअरींग वर्क्स ८.००% ज्यादा दराने
मे. साईविणा इंटरप्राईजेस १२.२४% ज्यादा दराने

७) अस्मिता पार्क येथील पंपिंग स्टेशनची देखभाल/दुरूस्ती करणे.
(अंदाजित रक्कम रू. १६,१६,५४०/-)

**ठेकेदाराचे नाव** **देकार**

**मे. ॲकॉर्ड मार्केटींग ॲन्ड सर्व्हिसेस** **४.५९% ज्यादा वाटाघाटीअंती २.८० % ज्यादा दराने**
मे. ग्रॅव्हीट इंजिनिअरींग वर्क्स ८.००% ज्यादा दराने
मे. साईविणा इंटरप्राईजेस १२.२४% ज्यादा दराने

८) जेसल पार्क मलनिःसारण केंद्राची देखभाल/दुरूस्ती करणे.
(अंदाजित रक्कम रू. १८,३४,५४४/-)

**ठेकेदाराचे नाव** **देकार**

**मे. ग्रॅव्हीट इंजिनिअरींग वर्क्स** **१.०० % कमी दराने**
मे. ॲकॉर्ड मार्केटींग ॲन्ड सर्व्हिसेस ०.७० % कमी दराने
मे. साईविणा इंटरप्राईजेस १२.२४% ज्यादा दराने

उपरोक्त कामाचा तुलनात्मक तक्ता पाहता अ.क्र. १ ते ७ च्या कामांकरीता मे. ॲकॉर्ड मार्केटींग ॲन्ड सर्व्हिसेस यांचे दर लघुत्तम आहेत तर अ.क्र. ८ च्या कामाकरीता मे. ग्रॅव्हीट इंजिनिअरींग वर्क्स यांचे दर लघुत्तम आहेत. सबब उपरोक्त लघुत्तम दर वाजवी व रास्त असल्याने सदर निविदा मंजुरीस व याकामी वेळोवेळी येणारी देयके मंजूर करणेस मा. स्थायी समिती सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. जुबेर इनामदार** **अनुमोदक :- श्रीम. ग्रिटा फॅरो**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण २४, नाले सफाई कामाचा आढावा घेणे.

**अनिल सावंत :-**

प्रशासनाने गोषवाराचं दिलेला नाही.

**जुबेर इनामदार :-**

का देत नाही साहेब

**अनिल सावंत :-**

संबंधित विभागाने गोषवारा का दिला नाही

**मा. आयुक्त :-**

गोषवा-याशिवाय विषय आला म्हणून आमचा गोषवारा घ्यायला पाहिजे ना

**अनिल सावंत :-**

कुठे काय झाल. कुठे साफसफाई झाली दयाला पाहिजे ना?

**याकुब कुरेशी :-**

गोषवारा येत नाही तोपर्यंत कसा काय विषय घेता तुम्ही

**मा. सभापती:-**

आपल्याला आढावा म्हणून

**मा. आयुक्तः-**

आढावा म्हणजे चर्चा म्हणून

**मा. सभापती:-**

साहेब विभागामध्ये साफ सफाई व्यवस्थित होत नाही. जे नविन कॉन्ट्रॅक्टर आलेत ना.

**मा. आयुक्तः-**

मागच्या वेळी तुम्ही ठरवलंना की, कॉन्ट्रॅक्टरचे पेमेंट सभासदांच्या सहया झाल्याशिवाय करायच्या नाही

**जुबेर इनामदार :-**

शेअर बुडल्यानंतर

**मा. आयुक्तः-**

शेअर कशाला बुडेल, तुमच्या सांगण्यावरुन बुडत असेल तर माझं काही म्हणणं नाही.

**जुबेर इनामदार :-**

माझा आरोप आहे मालकांच्या राज्यामध्ये शेअर बुडणार, माझा शेअर बुडाला.

**मा. आयुक्तः-**

शक्यच नाही.

**जुबेर इनामदार :-**

आयुक्त साहेब आमच्याकडे येऊन फिरा तुम्हाला फिरवतो माझ्या बरोबर.

**मा. आयुक्तः-**

सकाळी साडे नऊ वाजल्यापासून मी साईटवर आहे. साडेनऊपासून अकरावाजेपर्यंत मी फिरुन आलो.

**जुबेर इनामदार :-**

कुठे फिरताय तुम्ही, आम्हाला सांगायचना आमच्या वॉर्डमध्ये फिरताना तुम्हाला सांगितलं असतना, तुम्ही आम्हा सांगितलं असते तुम्ही आमच्या वॉर्डमध्ये गेले तर आम्ही आलो असतोना

**मा. आयुक्तः-**

जिथे जिथे पाणी तुंबलेलं आहे. तिथे तिथे जाऊन आलो.

**जुबेर इनामदार :-**

बरोबर आहे साहेब जिथे जिथे तुमचे अधिकारी तुम्हाला घेऊन गेले तिथे तुम्ही गेलात.

**मा. आयुक्तः-**

नाही नागरीकांचे प्रश्न जिथून जिथून फोन आले तिथे तिथे जाऊन आलो. अधिका-यांच्या सांगण्यावरुन नाही गेलो.

**जुबेर इनामदार :-**

एस.आय. खैरे ला फोन लावायचा माझे सकाळपासून त्याला किती फोन आहेत. कुठे कुठे पाणी तुंबलय ते त्याला विचारा, मी या विषयाबद्दल किती फोन केले. ते तुम्हाला लोकांनी नाही सांगितलेका? तुम्ही नसाल गेलेले साहेब, साहेब या विषयावर मी पत्र व्यवहार करतोय, सुचना करतोय माहिती देतोय की कुठले नाले साफ झालेले नाही. आजही ते नाले साफ झालेले नाहीत.

**मा. आयुक्तः-**

कुठचे नाले.

**जुबेर इनामदार :-**

आमच्या नया नगर परिसराचे ८ वॉलचे नाले आहेत. टोटल आजही तशी परिस्थिती आहे साहेब नाले साफ करताना झाकण तरी उचलताना साहेब ते तुम्हाला दिसेलना. इंटरनल नाले, नैसर्गिक नाले, मुख्य नाले अजूनही तसेच आहेत. ज्याप्रकारे केले पाहिजे त्याप्रकाराने काम झालेले नाही. वेळेवर केले नाही. पाऊस पडल्यानंतर जेसीबी जाऊ शकत नाही हे वारंवार सांगत होतो. आजही तिच परिस्थिती आहे तिकडे १०० टक्के जाऊ या का? इंटरनल नाले बघायला.

**चंद्रकांत मोदी :-**

जहा निकला है उधर से उठाया नही है। साहब, बारिश आता है, फिर से नाले मे जाता है।

**मा. आयुक्त :-**

किती घर बुजली?

**जुबेर इनामदार :-**

कुठली? साहेब, घेऊन जातो ना तुम्हांला.

**मा. आयुक्त :-**

गाव बुडणार मालकाच्या राज्यात, तुम्ही जो एस.एम.एस. केला आहे. ती किती घरं बुडाली आणि किती पाणी शिरलं ते आपण जायचना घरता बघायला.

**जुबेर इनामदार :-**

दाखवतो ना त्या घरामध्ये नेऊन.

**मा. आयुक्त :-**

स्थायी संपली की न जेवताच तुमच्या बरोबर येतो.

**जुबेर इनामदार :-**

१०० टक्के जाऊया आपण.

**शरद पाटील :-**

साहेब आपण केबीन रोडला गेला होतात. पाणी आहे की नाही तिथे ते पाणी नाले साफ न झाल्यामुळे आपले पंप लावलेत फाटकावर त्याला पाणी पुरत नाही. तिकडचे पाणी ओसरत नाही. याचे कारण काय? पंपाला पाणी पुरं पडत नाही. मी तिथे होतो पंपाजवळ एका पंपाला पाणी पुरं पडून पण दुसऱ्या पंपाला पाणी पुरं पडत नाही. तिकडचे पाणी ओसरत नाही म्हणजे मी तिथून फोन केला पानी कितना है। पानी बहूत है। गटार साफ न झाल्यामुळे ते पाणी इथे येत नाही.

**मा. आयुक्त :-**

केबीन रोडला गेलो आम्ही केबीन रोडला गेल्यानंतर पाणी जे शांत उभे राहीले होते त्यामुळे वाहतुकीला वेळ मिळत नव्हता. कारण जो टायमिंग होता तो हायटाईडचा होता आणि आता तो ओसरला आम्ही तिथेच जवळ जवळ २ तास होतो.

**शरद पाटील :-**

तुमचं म्हणणे मान्य आहे. मी ते बोलतच नाही. पण तिथे पाणी भरलेले असताना इथेच पंम्पींग लावतो. त्या पंम्पींगला पाणी पुरे पडत नाही. गटारातून रेल्वेच्या पाण्याचा निचरा होत नाही

**मा. आयुक्त :-**

रेल्वेच्या गटारातूनच फिरुन आले आम्ही आता.

**शरद पाटील :-**

साहेब, रेल्वेच्या गटारामधूनच पाणी जात नाही. इंटरनल गटार तर सोडूनच द्या तुम्ही ती तर भरलेलीच आहेत. पण रेल्वेच्या गटारामधून पाणी जात नाही.

**मा. आयुक्त :-**

रेल्वेचे गटारच कुठे कुठे अडलय पाणी ते आम्ही साफ केले.

**शरद पाटील :-**

साफच केलेले नाही. तेच बोलायचे आहे मला.

**जुबेर इनामदार :-**

पाऊस अजून लागलेला ही नाही.

**मा. आयुक्त :-**

मुळतः हा प्रॉब्लम कुठेही असता तरी पहिल्या पावसाला होत असते. पहिल्या पावसानंतर दुसऱ्या पावसाला हे होते हे काही नविन नाही.

**याकुब कुरेशी :-**

साहेब, नाले साफ केले असले तर होत नाही.

**मा. आयुक्त :-**

नालेसफाई मा. महापौर, स्थायी समिती चेअरमन हे तीन दिवस तसेच मिरारोडच्या कौन्सीलरला पण मी फिरुन दाखविले आहे. सगळे नाले फिरुन दाखवलेले आहेत. महापौर पण माझ्या बरोबर होते. मिरारोडचे कौन्सीलर पण माझ्या बरोबर होते. ईस्टला सगळ्यांना घेऊन फिरलो.

**चंद्रकांत मोदी :-**

इंटरनल गटार साफ झाली नाहीत साहेब.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही म्हंटल नाही. नालेसफाई झाली नाही.

**शरद पाटील :-**

मी पत्र दिलेल आहे साहेब, माझे पत्र आहे नालेसफाई झाली नाही म्हणून.

**चंद्रकांत मोदी :-**

इंटरनल गटार साफ नही हुआ तो पानी भरेगा ना साहेब आज भी इंटरनल गटार शांतीनगर मे भी सफाई नही हुआ। कचरा निकाल कर बाहर रखा है उसको उठाया भी नही। आधा काम लिखा आधा नही दिया।

**मा. आयुक्त :-**

आता बघायला जायच ना पहिल्यांदा मिरारोड नंतर ईस्ट बघायचा आहे.

**याकुब कुरेशी :-**

साहेब भाईंदर वेस्ट दिसतच नाही का?

**जुबेर इनामदार :-**

आयुक्त साहेब, पाऊस थांबला ना?

**शरद पाटील :-**

आयुक्त साहेब आम्ही पत्र दिले आहे, नालेसफाई झाली की नाही म्हणून.

**मा. आयुक्त :-**

झाले तरी देतात, नाही झाले तरी देतात. डोळ्यांनी जाऊन बघू ना आपण.

**शरद पाटील :-**

म्हणजे तुम्ही आम्हाला खोटं ठरवता का?

**मा. आयुक्त :-**

आता तर पत्र जास्त यायला सुरु होतील.

**चंद्रकांत मोदी :-**

साहब, कॉन्ट्रॅक्टर को आदेश दिजीए ना।

**मा. आयुक्त :-**

म्हणूनच तुमच्या बरोबर बघायला येतो म्हणून सांगितले ना मी.

**शरद पाटील :-**

तुम्ही आता केबिन रोड बघून आलातच ना? बघायचं आणखीन काय बाकी राहिल.

**मा. आयुक्त :-**

आता दररोजचा एरिया ग्रामपंचायत काळापासून त्या ठिकाणी पाणी तुंबतं. माझं पूर्ण बोलणे ऐकून घ्या मग बोला. तुम्ही रेल्वेने कंपाउंडच्या खालच्या बाजूला बीम टाकलेले. म्हणजे कंपाउंडवर बांधलेले आहे. आणि पूर्वी जे आपले कंपाउंडला होल होते ते होल काढायला जमत नाही कारण टोटली रस्त्याच्या बाजूला बीम टाकून वर भिंत बांधलेली आहे. होल तोडून काढायला पाहिजे. सळई आहेत त्यामध्ये पूर्वी होल होते. त्यामुळे रस्त्यावरच पाणी रेल्वेच्या गटारात यायचे. तिथे बीम टाकून वर भिंत बांधलेली आहे. बीम टाकताना होल ठेवायला पाहिजे होते.

**शरद पाटील :-**

तुमचे म्हणणे एकदम बरोबर आहे. सर, पण अधिका-यांना आहे का अक्कल तेवढी त्यांना वारंवार बोललेलो आहे त्यांचे कंपाउंड टाकतात. सिमेंट भरताना तेव्हा तुम्ही......

**मा. आयुक्त :-**

कंपाउंड बांधले असते तर होल पडता आले असते. तिथे बिम टाकलेले आहे.

**शरद पाटील :-**

तुमच्या प्रत्येक इंजिनिअरला त्यावेळी सांगत होतो त्यांचे काम चालू असेल तेव्हा तुमची दोन माणसं ठेवा. त्यात पाईप टाकून घेत जा नाही टाकले, नाही कोणी लक्ष दिले.

**मा. आयुक्त :-**

पण त्यांनीसुध्दा पाईप टाकले परंतु तुमच्या मताप्रमाणे बीमच्या खालच्या बाजूला पाईप टाकायला पाहिजे होते. कंपाउंड वॉल बांधताना एक-पाऊण फुट वर पाईप टाकलेले आहेत त्यामुळे पाणी जाऊ शकत नाही. बीमच्या खाली पाईप पडायला पाहिजे.

**शरद पाटील :-**

म्हणून सांगतो जेव्हा ते काम चालू होते ना तेव्हा मी वारंवार सांगायचो. श्री. कांबळेंनी पण सांगावे, खांबित साहेब तुम्हाला पण मी बोललो होतो. रेल्वेचे काम चालू होते त्यावेळी तुमचा माणूस तुम्ही ठेवा. कारण ते कधीही काम करत होते. त्यात दोष कोणाचा असेल हे मी बोलत नाही. रात्री बे रात्री कधीही त्यांचे काम व्हायचे. पण त्यावेळी सांगितले तुम्ही त्यांच्यांशी कॉन्टॅक्ट करुन पाईप टाकत रहा. पण त्यांचे काम बघितले, काम झाल्यानंतर आम्ही मशिन लावून पण पाहिले. त्याने पण त्याला ड्रील होत नाही.

**मा. आयुक्त :-**

आता चार वाजेपर्यंत काहीही आणून ते होल पाडायचे म्हणून सांगितले. टोटल ५०-६० होल पाडायला सांगितले.

**शरद पाटील :-**

साहेब, तुमचे धन्यवाद. जर झाले तर तुमचे अभिनंदन करतो.

**अनिल सावंत :-**

साहेब, आपतकालीन सेवा चालू केली का? त्यांचे फोन नंबर द्या.

**मा. आयुक्त :-**

पुस्तक घ्या ना.

**अनिल सावंत :-**

चोवीस तास चालू आहे. अग्निशमनची अवस्था काय आहे?

**चंद्रकांत मोदी :-**

साहब, फोन नाही उठाया तो क्या कारवाई?

**चंद्रकांत म्हात्रे :-**

आपतकालीनचे फोन चालू आहेत का?

**मा. आयुक्त :-**

फोन कुणी उचलला नाही तर सांगा आम्हांला इतक्या वाजता ह्या ह्या वेळी फोन केला होता तर तिथला सगळा स्टाफ निलंबित होईल. मुख्यालयात तुम्ही फोन कराल तेव्हा तुम्ही सांगा.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, नालेसफाई हा एक विषय आहे. तो गरजेचा होता. युध्द पातळीवर करायलाच पाहिजे. रोजचा कचरा उचलणे हा त्यातलाच विषय आहे. कचऱ्याचा विषय आजही तसाच आहे. आजही यावेळी प्रशासनाने सुचविलेल्या पध्दतीप्रमाणे आपण गट निर्माण केले. गटाप्रमाणे ठेकेदारांना खाजगी पध्दतीने आपण ठेका दिला. खाजगी पध्दतीने आपण त्यात इष्टांक  केलेला नाही. प्रत्येक गटामध्ये किती कर्मचारी असायला पाहिजे. ठेकेदाराला जिथे वीस माणसं लागतात तिथे तो १० माणसच कामाला ठेवतो. १० माणसांनी राब राब राबायचे आणि काम पाहिजे तसे होत नाही. आपण ठराव करताना दि. ०१/०७/२००९ रोजी महासभेमध्ये ठराव केला. त्या ठरावात स्पष्ट दिले आहे की, प्रत्येक ठेकेदाराने त्या कर्मचाऱ्यांना गणवेश द्यावा. प्रत्येक ठेकेदाराने कर्मचाऱ्याला गणवेश द्यावा. त्या गणवेशावर गट क्र. आणि ठेकेदाराचे नाव असावे. म्हणजे तो स्पष्ट दिसून येईल की हा कर्मचारी कुठच्या गटाचा आहे. एका गटात तेच कर्मचारी आणि दुसऱ्या गटातही तेच कर्मचारी. अशाप्रकारे ठेकेदारांची काम करण्याची पध्दत आहे. त्याला कुठेतरी अंकुश लागेल. आज दिनांकापर्यंत साहेब त्या ठरावाची अंमलबजावणी झालेली नाही, त्याला कारणाभूत कोण? काय केले त्या विषयाबद्दल तुम्ही? आम्ही सतत ह्या विषयावर पत्रव्यवहार केलेले.

**शरद पाटील :-**

साहेब, या विषयावरच बोलायचे आहे जी रोजची साफसफाई पहिल्यांदा होत होती त्याप्रमाणे आता होत नाही. कारण आपण जो नियम लागू दिला. त्याला कितीही कर्मचारी ठेवा. वॉर्ड साफ झाला पाहिजे. पण दहा माणसाच जेवढा एका माणसाला जेवायला सांगितले तर जेवण होणार नाही त्या माणसाला. त्यामुळे रोजची साफसफाई बरोबर होत नाही. तोच कचरा परत गटारात जातो.

**चंद्रकांत मोदी :-**

साहेब, विनंती आहे ये सब छुट जायेगा प्रश्न। हर एक एरिया के नगरसेवक को ठेकेदार लिस्ट दे दे की इतने कर्मचारी तुम्हारे एरिया मे है। डिवाईड वॉर्डवाईज करिए। ये वॉर्ड का उधर घुमाते है। इधर का उधर घुमाते है।

**चंद्रकांत म्हात्रे :-**

अर्धा वॉर्ड दुसऱ्या कॉन्ट्रॅक्टरकडे, अर्धा वॉर्ड दुसऱ्या कॉन्ट्रॅक्टरकडे आहे. एक वॉर्ड साफ होतोय दुसरा वॉर्ड साफ होत नाही. ते काय म्हणतात, त्या वॉर्डचे काम दुसऱ्या कॉन्ट्रॅक्टरकडे आहे. कॉन्ट्रॅक्टर दुसरा आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

कर्मचारी कहॉ है? वही कर्मचारी उधर लाकर दिखाता है।

**मा. आयुक्त :-**

मा. सभापती साहेब, यापूर्वी कर्मचाऱ्यांच्या संख्येवर ठेका दिला होता. ठेका दिल्यानंतर अशी परिस्थिती झाली की त्यामध्ये युनियन तयार झाली. युनियनमध्ये किमान वेतन कायद्याप्रमाणे रक्कम दिली नाही तर फौजदारी गुन्हा दाखल करायचा. तो प्रस्ताव कामगार आयुक्तांकडून गर्व्हमेंटकडे गेला. गर्व्हमेंटने किमान वेतनाप्रमाणे रक्कम द्यायला पाहिजे असे सांगितले. यातून महापालिकेला सुटका करावी क्रिमिनल गुन्ह्यातून म्हणून आपण ही आयडीया काढली. त्याचा जर दुरुपयोग होत असेल म्हणजे आता वस्तुस्थिती खरी आहे. दुरुपयोग होतोय. आपण त्यांना या कचाट्यातून म्हणजे त्यांच्यावर गुन्हा दाखल आणि महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांवर क्रिमिनल गुन्हा दाखल करायला कामगार आयुक्तांनी गर्व्हमेंटकडे परवानगी मागितली. त्यातून वाचविण्यासाठी साफसफाईचे टेंडर दिले म्हणण्यासाठी या पध्दतीने टेंडर काढले. त्याचा सर्व ठेकेदार अधिकाराचा दुरुपयोग करत असेल तर प्रत्येक नगरसेवकांच्या वॉर्डामध्ये त्यांच्या वॉर्डात काम करणारे कर्मचारी कोण असेल त्याचा फोटो आणि नावाची यादी म्हणजे तुम्ही ओळखणार कसे? आता मी ज्या ज्या एरियामध्ये

बघून आलो त्यामध्ये सोनावणे आणि सॅनेटरी इन्स्पेक्टर बांगर आणि त्यांचे मुकादम यांना आज निलंबनाची ऑर्डर काढायला लावलेली आहे आणि बाकीचे जिथे जिथे आम्ही प्रत्येक नगरसेवकांच्या वॉर्डमध्ये कोण कामगार, किती कामगार, कोण कोण कामगार फोटोसह प्रत्येक नगरसेवकांना त्यांच्या वॉर्डमध्ये काम करणा-यांची लिस्ट मिळेल. जो ठेकेदार देणार नाही त्या ठेकेदाराचे टेंडर रद्द केले जाईल.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

चांगलं आहे साहेब, एक विचारतो साहेब, वॉर्ड नं. ५९ त्यामध्ये अर्धा वॉर्ड दुस-या कॉन्ट्रॅक्टरकडे आहे, दुसरा अर्धा वॉर्ड दुस-या कॉन्ट्रॅक्टरकडे आहे.

**अनिल सावंत :-**

असं होऊ शकत नाही. त्यांनी आपसात करुन घेतले असेल. ठेकेदाराने आपसात करुन घेतले असेल.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

जी सत्य परिस्थित आहे ती सांगितली. त्यामुळे एका ठिकाणी साफसफाई ठिक होते, एका ठिकाणी साफसफाई होत नाही. कारण त्याला विचारणा केली तर तो सांगतो की, त्या वॉर्डचा ठेकेदार मी नाही दुसरा आहे. हा मोठा प्रॉब्लम होतो.

**मा. आयुक्त :-**

आपण सॅनिटरी इन्स्पेक्टरला ठेकेदार एका वॉर्डा डिव्हायडेशन केलेले नाही. तर ते सॅनिटरी इन्स्पेक्टर आणि मुकादम तुमच्या संपर्कात असतात तर तुमचा ठेकेदार कोण? अर्धा अर्धा वॉर्ड असं काहीच नाही. वॉर्डची बॉन्ड्री एकेका ठेकेदाराला दिली म्हणजे तुमच्या वॉर्डाची बॉन्ड्री एका ठेकेदाराकडे असे किती वॉर्डची बॉन्ड्री हे ठेकेदाराकडे फिक्स आहे. त्यामुळे अर्धा वॉर्ड इकडे अर्धा वॉर्ड इकडै असे कुठलेच झालेले नाही.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

बॉन्ड्रीच सांगतो साहेब, बॉन्ड्री आहे ना साहेब ती वेगळी आहे. एका वॉर्डमध्ये दोन बॉन्ड्री झालेल्या आहेत. म्हणून ती एकत्र आली तर फायदेशीर आहे.

**मा. आयुक्त :-**

करु ना.

**अनिता पाटील :-**

साहेब माझ्या वॉर्डची परिस्थिती अशी आहे की, तीन महिने माझ्या वॉर्डला वालीच कोण नव्हता. म्हणून ठेकेदाराला फोन केला तर कचरा उचलला तर सांगतो की माणसं मिळत नाही. राज कन्स्ट्रक्शन म्हणून आहे त्याचा मुकादम मला येऊन भेटतो आणि सांगतो. मॅडम, माणसं येत नाही म्हणून कचरा उचलला जात नाही. त्याच्यात आमची काय चूक आहे. तिथे राहणा-यांची काय चुक आहे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, माझ्याकडे ठेकेदार आहेत ते कोणआहेत? कांबळे साहेब मिरारोडमध्ये सुभाष आणि दुसरा कोण आहे, नाव माहित नाही. त्या ठेकेदारांची सातत्याने मी तक्रार करतोय. मला अशी माहिती देण्यात आली आहे. आम्ही त्यांना नोटीस बजावलेली आहे. साहेब, तशी नोटीस बजावलेली असती तर त्यांच्यावर कार्यवाही होईल का? की फक्त नोटीस दिली की विषय संपतो.

**मा. आयुक्त :-**

प्रश्न असा आहे. यापूर्वी संख्येवर होते. संख्या फक्त तुम्हाला दाखवण्यासाठी होती आणि ॲक्च्युअली तेवढे नव्हते. ॲक्च्युअली परिस्थिती १६४१ कामगार काम करतात असे सर्व ठेकेदारांकडे दाखवले होता. परंतु प्रत्यक्षात त्यामध्ये ४०० लोक सुपरव्हीझन करायला होती. म्हणजे २ कामगारांवर १ सुपरव्हीजन मुकादम, आपले मुकादम सोडून म्हणजे तुम्हाला कामगारांची संख्या अवाढव्य दाखवली तरी काम करणा-यांची संख्या कमीच होती. त्यावेळी पण कारण ४०० लोक सुपरव्हीजन करत होते, १२०० लोकांवर.

**जुबेर इनामदार :-**

ठरवलेले धोरण चुकीचे ओ किंवा वाईट आहे असा विचार तुम्ही केला असेल अशाप्रकारे गटाप्रमाणे केल्याने आपले काम चांगले होईल. हा तुमचा भाग चुकीचा नाही आहे. साहेब, मात्र आजच्या तारखेस जे ठेकेदार करतात ते तेच करत आहेत. साहेब, त्यांनी २० माणसांच काम आहे तिथे १० माणसांना राबवतात.

**शरद पाटील :-**

साहेब, त्यांनी तुमचा गैरफायदा करायला घेतला आहे.

**जुबेर इनामदार :-**

फायदा ठेकेदार घेतात.

**शरद पाटील :-**

तुम्ही केले ते बरोबर आहे. पण तुम्ही एकदम ५० होते तिथे ५ केले तर त्याचा फायदा होणार नाही. तसे केलेले आहे त्या लोकांनी.

**मा. आयुक्त :-**

बरोबर, परिस्थिती काय होती, त्या त्या वॉर्डामध्ये त्या त्या लोकांच्या व्हाईट कॉलरची जी लोकं होती ती सुपरव्हीजन करायची. ते ४५० ते ५०० होते. आणि ते १०-१२ लोकांकडूनच काम करुन घेत होते. तुमच्याकडून तक्रारी यायच्या नाही. कारण आपला मुलगा सुपरव्हीजन करतोय.

**शरद पाटील :-**

नाही नाही, ते तमचे म्हणणे बरोबर आहे ते केले ते काढले. ते पण तुमचे बरोबर आहे. पण आता तुम्ही त्याचे स्पष्टीकरण पण तेवढेच खरं आहे.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

चांगला निर्णय घेतला तुम्ही.

**मा. आयुक्त :-**

आता तुमच्याकडे प्रत्येक वॉर्डमध्ये तुमचे कामगार कोण आहेत त्याचे नाव काय त्याचा फोटोसह तुमच्याकडे लिस्ट देऊ ना आम्ही. आता काढायलाच लावतो.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

चांगली गोष्ट आहे साहेब.

**मा. आयुक्त :-**

जर कामगार मिळत नसतील तर त्याने ठेका घ्यायचा नाही.

**मदन उदितनारायण सिंह :-**

साहेब, लिस्ट देणार ते बरोबर आहे पण कुठल्या वॉर्डात किती कामगार असले पाहिजे याची संख्या निश्चित करुन घ्यावी.

**मा. आयुक्त :-**

साफसफाई आणि गटाराच्या लांबीवर अवलंबून आहे त्यानुसार संख्या ठरवून देतो.

**अनिल सावंत :-**

साहेब ह्याठिकाणी शहरामध्ये.

**मा. आयुक्त :-**

कामगार आयुक्तांनी क्रिमिनल गुन्हा दाखल करायला परवानगी मागितली आहे. त्यामुळे आम्ही लेखीमध्ये इतके कामगार आणि फोटो, नांव अशी कामगारांची नाव लिहित नाही. सोबत कागद देतो आणि इतके कामगार आहेत तुमच्या वॉर्डामध्ये म्हणजे फक्त कामगार तुमच्या वॉर्डमध्ये इतके कामगार आहे ते देतो.

**जुबेर इनामदार :-**

ठेकेदाराने त्याच्या लेटर पॅडवर द्यावे. महापालिकेने कशाला द्यावे.

**मा. आयुक्त :-**

ठेकेदाराने जरी दिले तरीसुध्दा क्रिमिनल गुन्हा होणार. तर आपण सभासदांना इतके लोक तुमच्याकडे काम करतात असे देऊ. संख्या आणि त्यांचे फोटो अनऑफीशिअली तुम्हांला देऊ.

**जुबेर इनामदार :-**

रोज माणसं बदलली तरी चालतील.

**मा. आयुक्त :-**

प्रश्न तो नाही म्हणजे तुमच्या वॉर्डात जे कामगार दाखवणार तेच दुस-या वॉर्डात संख्या नेऊन मोजतील ना.

**अनिल सावंत :-**

तसेच करतात ते साहेब.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

आता तुम्ही सांगा पाऊस आल्यानंतर ते कर्मचारी ....

**अनिल सावंत :-**

तुमची अशी अपेक्षा आहे का त्यांनी पावसात काय करावे अथवा करूच नये. या दोन्हीपैकी एकच होऊ शकत.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

पाऊस तर कंपलसरी दिवसभर पडतच राहणार. मग ते कामाला आल्यानंतर त्यांच्याकडे रेनकोट किंवा छत्री अशी नसली की ते बाजूला जाऊन इभे राहतात. पाऊस थांबायची वाट बघत.

**मा. आयुक्त :-**

सूचना दिलेल्याची अंमलबजावणी केव्हापासून होणार.

**मदन उदितनारायण सिंह :-**

नाही झाली तर काय करायच.

**याकुब कुरेशी :-**

साहेब मी एक गोष्ट सांगू इच्छितो, या स्थायी समितीचे अधिकार काय आहेत. आणि या अधिकाऱ्यांना किती कळतात त्याची जाणीव त्यांना द्या. तर सगळ लाईन वर येईल.

**अनिल सावंत :-**

आता चार्ज कोणाला दिला आहे नालेसफाईचा.

**मा. सभापती :-**

साहेब हे जे कॉन्ट्रक्टवाले आहेत ना. ह्यांच्याकडून आपण पैसे कट करा ना. जाऊ द्या ना आपण ऑर्डर द्या आणि त्यांच्या ठेक्यामधून पैसे कट करा ना.

**मा. आयुक्त :-**

सभासदांच्या सह्या झाल्याशिवाय पेमेंट करणारच नाही. मागच्या वेळेला ठरवल्याप्रमाणे स्थायी समिती मी नव्हतो त्यामुळे पेमेंटचा प्रश्नच येणार नाही.

**अनिल सावंत :-**

त्यांना रेनकोट आणि गणबुट द्या?

**जुबेर इनामदार :-**

म्हणजे आम्ही त्यांना वारंवार त्रास देणार नाही. त्यांच्यावर कामाचा बराच बोजा असतो. आम्ही त्यांना विचारल तर आम्हाला म्हणाले आम्हाला डी.एम.सी. नाही.

**अनिल सावंत :-**

आता खांबित साहेबांना दिलाय का चार्ज?

**जुबेर इनामदार :-**

खांबित साहेबांना दिलेय नालेसफाई, सुपरविजन दिल डि.एम.सी. तुम्हीच आहात.

**अनिल सावंत :-**

तुम्ही सांगाना काय करणार ते. त्यांचे पैसे कट करून त्यांना रेनकोट प्रोव्हाईड करणार का?

**जुबेर इनामदार :-**

डी. एम.सी. तुम्ही  असला तर तुम्हाला आदेश गणवेश, रेनकोट.

**अनिल सावंत :-**

गणवेश सोडा पण पावसात रेनकोट तरी देऊ देत.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, पूर्वी सफाई कामगार होते. ते रस्त्यावर ब्रश मारायचे. ब्रश मारून सफाई होत होती. आता अस झाल आहे ब्रशच नाही त्यांच्याकडे माती उचलायला सांगितली तर ५-५ दिवस येत नाही. बघायला. मी सातत्याने सांगतो. आमचा एक ठेकेदार आहे. मला पाच माणस दे उभ राहून मी करून घेतो काम.

**मा. सभापती :-**

अहो साहेब आपण खुलासा द्या. तुम्ही डिपार्टमेंटचे हेड आहात ना. आश्र्वासन मिळालेला काय बोलतात. ते काहीतरी बोलले पाहिजे ही मिटींग आहे.

**जुबेर इनामदार :-**

सभापती साहेब, आपण या शहराला विशेष काही देऊ शकत नाही. लोकांना, पाणी पुरवू शकत नाही. कारण आपल्याकडे पाणी पुरवठा कमी आहे. कमीत कमी आरोग्याचा जो विषय आहे. तो तरी महापालिकेने करधारकांकडून कर घेता, कराच्या माध्यमातून जो पैसा घेता आपण तेव्हा चांगल्या आरोग्याची सोय सुविधा तरी पुरविली पाहिजे.

**मा. सभापती :-**

साहेब विषय घ्या. गणवेश वाटप, रेनकोटच काय आहे.

**अनिल सावंत :-**

साहेब, हा जो ठेकेदारांचा चाललेला विषय आहे. माझ अस मत आहे की स्थायी समिती सदस्य आणि ठेकेदारांची जॉईंट मिटींग लावा. लवकरात लवकर आणि त्याच्यावर काहीतरी मार्ग काढा. नाहीतर या चार महिन्यामध्ये संपूर्ण शहराची वाट लागणार. इंटरनल काही होणार नाही.

**शरद पाटील :-**

आयुक्त साहेब, स्थायी समिती सदस्य आणि ठेकेदारांची मिटींग नका लावू तुम्ही तुमच्या पध्दतीनेच करा.

**मा. आयुक्त :-**

मी मिटींग घेतो. नाहीतर तुमच्यापुढे बोलवितो.

**मा. सभापती :-**

आपल्याकडे बोलवून काही फायदा होत नाही.

**जुबेर इनामदार :-**

साहेब या शहराने तुम्हाला मालकाची पदवी दिली आहे. आमचे शहर आहे. तेवढे तुमचे शहर आहे.

**मा. आयुक्त :-**

साहेब एक सांगतो तुम्हाला प्रामाणिकपणे मी सकाळी आल्यानंतर नऊ वाजता सगळ काम बघूनच जातो. सगळे नाले पावसाळ्याचे मी स्वतः फिरून बघून आलो आहे. आणि बरोबर महापौरांना ठेवल आहे. कुठे पाणी अडल आहे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब मेन नाले साफ झाले असेल तरी अंतर्गत नाले साफ झाले नसतील. तर पाणी पुढे जाणार करू.

**प्रविण पाटील :-**

साहेब, तुम्ही जे नाले फिरलेत ना ते तुम्हाला अधिका-यांने दाखवललेले आहे. नगरसेवकांनी जे नाले बघितले ते तुम्ही नाही बघितले. तुम्ही आमच्या वॉर्डात आलेले आहेत. मला सांगितले की, आयुक्त साहेब येऊन गेलेत. पण जो बघायचा को नाला तुम्ही बघितलाच नााही. मेन एस.एन, कॉलेजचा नाला बघितला. पण त्याच्यामागे जो मोठा नाला आहे. तिथे अजून मशिन नाही लागली अजून भरलेला आहे तो सांगायच तात्पर्य काय आहे की, तुम्ही स्थानिक नगरसेवकांना थोड विश्वासात घ्या. अधिका-यांपेक्षा त्यांना माहित आहेत नाल.

**शरद पाटील :-**

साहेब, तुमच्या कार्यक्षमतेवर आमचा पूर्ण विश्वास आहे. आम्ही त्याबद्दल बोलत नाही. याकुबजी बोलतात. तुम्हाला अधिका-यांनी दाखवल तेवढ बघितल. नगरसेवकांना विश्वासात घ्याना. साहेब नर्मदा गार्डनचा नाला गोडदेव वरून जातो.

**मा. आयुक्त :-**

पाटील साहेब, आता नवीन काय सांगू मी आता स्थायी समिती संपल्यानंतर जाऊ या ना बघायला.

**शरद पाटील :-**

ठीक आहे जाऊया आपण. तुम्ही आता बोलात.

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही आमच्याबरोबर फिरा. आहेत ते नाले सर्व दाखवतो. तुम्ही म्हणता पहाणी करतो रोज सकाळी जातो. मुख्य नाले बघत असाल ना. माझ्याकडे सिताफळ परिसर आहे. तुम्हाला माहित आहे का कुठे आहे. ते सावंतेश्वर नगर आहे. माहित आहे का तुम्हाला कुठे आहे ते. असा परिसर आहे. अनिल सावंतला मी थाप मारली. तुम्हाला अशी. असा तुम्हाला कुठला परिसर माहित आहे. किंवा मुख्य नाले जे आहेत ते. आम्हाला माहित आहे का साहेब पाणी कुठे असते. १५-१५ वर्षे आम्ही तिथेच रहातो ना.

**मा. आयुक्त :-**

अडलेली ठिकाणे सगळी पाहिली मी.

**चंद्रकांत मोदी :-**

साहेब वो जो आपने गटार बनाया है ना वॉल खुला नही किया तो पानी कैसा जाएगा। वॉल ही बंद है। सभापती साहेब शांतीनगर परिसर मे जो नाले बनाये है नालेका वॉल ही खुला नही किया। अभी आरोग्य डिपार्टमेंटने मै सिरियस बोलता है। आंबेडकर रोड मे नाला खुला किया ही नही। बराबर साहेब, वॉड ऑफिस को पुछो

**मा. सभापती :-**

ठेकेदारांना ऑर्डर देतात.

**चंद्रकांत मोदी :-**

साहेब हमारे वॉर्ड ऑफीस जो बैठे हे उसको पुछो आंबेडकर रोड पे जो वॉल रहात है ना जो नाला के अंदर पानी जाने के लिए। गटार बांधली, स्लॅब टाकला लेकीन वॉल है वो खुला ही नही किया। बोलबोलके थक गया। कांबळे साहब को बोला, एस.आय. सो बोला।

**मा. आयुक्त :-**

अरे मैने साफ करके लिया। बंगले मे आज ही मिटींग बुलाकर खाली कर दिया।

**चंद्रकांत मोदी :-**

आज दिखाऊ साहब आपको एक भी फावडा लगाया है की उधर?

**मा. आयुक्त :-**

मै देखके आया काशीमिरा रोडपर।

**चंद्रकांत मोदी :-**

ये आंबेडकर रोड नही। सृष्टी जानेका शांती नगर के अंदर हा ये आंबेडकर दो है।

**मा. सभापती :-**

मोदीजी चर्चा बहुत हो गयी।

**चंद्रकांत मोदी :-**

नही साहेब आदेश तो किजीये कांबळे साहब को वॉल खुला करनेके लिए।

**मा. सभापती :-**

आयुक्त साहेब आपण गणवेश.....

**चंद्रकांत म्हात्रे :-**

शितल नगर मध्ये गेल्या दोन महिन्यापासून तिथे चक्री झुला लावलेला आहे. आणि तिथे त्या मैदानामध्ये जुगार चालते कालापिला काय म्हणतात तो, पत्ते करायचे, आणि मोठ मोठ्या रिंग उलटे फेकायच्या असे मोठ मोठे धंद करायचे झुला फक्त नावाला आहे. परवानगी आपण दिलेली आहे का त्याला?

**मा. सभापती :-**

पोलीस स्टेशनला कंप्लेंट द्याना त्याची.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

पण परवानगी दिली आहे का?

**जुबेर इनामदार :-**

शाळा आहे ना बाजूला.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

आणि तिथे जागेच भाडे घेतात २५ ते ३०, ५०-५० हजार रू. भाडे घेतात. जयू नावाचा माणूस आहे. ५० हजार रूपये त्या जाग्यावर चक्रीवाल्याला ठेवले आहे. त्याच भाड तो घेतो आहे. पालिकेची जागा आहे. ३-४ लाख मातीचा भरणा टाकून गणपतीच्या मंदिर समोरची साहेब,

**चंद्रकांत मोदी :-**

शीतल नगर ग्राऊंड

**चंद्रकांत म्हात्रे :-**

आर.जी. जागा आहे साहेब, ५० हजार रू भाडे घेतो. आणि आता पण चालूच आहे.

**निर्मला सावळे :-**

आयुक्त साहेब पूनम सागरचा जो शेड काढायला सांगितलेला. अतिक्रमण विभागाला अजूनपर्यंत काहीच कारवाई झालेली नाही. नाही काही नाही पत्ते सरकावून घेतात १-२ तासात परत आहे तसे लावात. २००० चौ. फु. जागा फर्निचर वाल्याने कव्हर केली आहे. तोडून टाकाना ते सगळ, बिल्डींग वाल्याने पुढे भिंती सुध्दा बांधल्यामुळे आहेत.

**मा. आयुक्त :-**

तुम्हाला चार दिवसापूर्वी ३ वेळा फोन करून सांगितल ते सगळ तोडून घेऊन जा म्हणून. तुम्ही काढल म्हणत म्हणजे मॅडमला फोन करायचा तुम्ही.

**निर्मला सावळे :-**

काहीच नाही आत्ता जाऊन साईट बघून या आता पण फोटो काढून दाखवा पाहिजे तर साहेबांना जशीच्या तशी परिस्थिती आहे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब ग्राऊंडचा विषय निघाला म्हणून.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

आहे ना झुले टाकले, चक्री त्याला परवानगी आपली दिली का? साहेब जयू नावाचा माणूस आहे. ५० हजार रूपये भाड घेतो. त्यांच्याकडुन

**जुबेर इनामदार :-**

साहेब तसाच आपला मैदानाचा विषय निघाला १७० च आरक्षण आहे. सोनालीच आपण आता तयार करायला घेतला. सुशोभिकरणाचे काम चालू आहे. आम्ही चार महिने ऑफिशिअली त्याला बंद कर ऑफिशिअली त्याला बंद करण्याची, परवानगी देऊ नका साहेब कोणाला , काम चालू आहे. लॉन वैगेरे तयार करणे आहे. पावसाळयामध्ये होऊन जाईल. तशी वॉर्ड ऑफीसला सूचना द्या.

**मा. सभापती :-**

साहेब माझा एक विषय होता. संगणक चालकांना आम्ही गेल्या स्टॅण्डींगमध्ये विषय घेतलेला. त्यांचे काय ३ महिने पगार अजून दिलेले नाहीत.

**अनिल सावंत :-**

दोन महिन्याचे एप्रिल आणि मे

**मा. सभापती :-**

४५ कामगार आहेत. त्यांचा आपण पगार का देत नाही. कशाला थकवलेला आहे. त्यांना पगार आपण केव्हा देणार आहात की देणार नाहीत.

**मा. आयुक्त :-**

पगार मिळणार नाही. ज्यावेळेला आम्ही कामावरून कमी केल आणि परत कामावर घेतल त्या टेन्युअरचा पगार मिळणार नाही.

**अनिल सावंत :-**

त्यांनी काम केलेल आहे.

**मा. आयुक्त :-**

मला महित नाही. मी काढून टाकल्यानंतर पुन्हा त्यांना मी ज्यावेळी ऑर्डर दिली, पुन्हा ज्यावेळी कामावर या म्हटल त्यावेळेपासून कामावर आले तेव्हा पासून पगार देण माझ्यावर बंधनकारक आहे. पण मी काढल आणि परत घेतल त्या मधल्या टेन्युअर मधला पगार मी देणार नाही.

**अनिल सावंत :-**

सर भूमीपूत्र आहे त्यांनी काम केलेल आहे.

**मा. आयुक्त :-**

तो तुम्ही सांभाळाना. ही महापालिका आहे. त्यामुळे आपल्याला नव्हते. मी काढून टाकल्यानंतर ते नव्हते आणि परत मी घेतल्यानंतर आले त्यामधल्या चेन्युअर मधील पगार देऊ शकत नाही. एलक्यु झाली, लक्षवेधी झाली. ती कशासाठी पाहिजे हे पण मला माहित आहे. पण तुमचा आस्थापनाचा खर्च आला ५६ टक्के वर गेला आहे. यांना ८० जणांना घेऊन तुम्ही ६५ टक्के वर जाल. पण नागरिकांकडून टॅक्स घेतल्यानंतर किती टक्के विकासाला लावणार हे विचार करा. त्यामागची पार्श्वभूमी आणि पंपींग वेगळा आहे. यामध्ये २४० दिवस घालवून त्यांना परमनंट करायचा, लेबर कोर्टात पाठवायला विषय आहे. मी बंद केले आणि परत सुरू केले. त्यामुळे त्या टेन्युअरचा पगार मी देणार नाही.

**अनिल सावंत :-**

म्हणजे देणार.

**मा. सभापती :-**

साहेब तुम्ही स्थायी समितीत सांगितल आम्ही देणार नाही पगार साहेब हा रितसर विषय महासभेत घ्या.

**मा. आयुक्त :-**

नाही, महासभेमध्ये घेऊन सुध्दा मी देणार नाही.

**मा. सभापती :-**

नाही, ठिक आहे. महासभेला पण कळू द्या. हे सर्व लोकप्रतिनिधींना तुम्ही हा विषय महासभेमध्ये घ्या.

**मा. आयुक्त :-**

महापौर साहेबांना सांगा मी गोषवारापण देणार नाही.

**मा. सभापती :-**

साहेब ते कर्मचारी आहेत. आपल्याकडे काम केलेली आहेत त्या लोकांनी आपण आपल्या डिपार्टमेंटला देऊ. बाकीचे ४५ कामगार आहेत. बाकीच्यांन कोण देणार त्या त्या डिपार्टमेंटला होईल.

(नाले सफाई कामाचा आढावा घेण्यात आला.)

**मा. सभापती :-**

मा. कमिशनर साहेब, उपायुक्त साहेब, सचिव साहेब, सर्व अधिकारी, आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडल्याबद्दल मी आपल्या सर्वांचे ह्या ठिकाणी आभार व्यक्त करून आजची सभा संपल्याचे जाहिर करतो. जय हिंद जय महाराष्ट्र!

**सभा संपल्याची वेळ :- दु. २.५० वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**